# संपादकीय

**ई-बुक्स- अजून खरा प्रभाव जाणवायचा आहे.**

नव्या तंत्रज्ञानाकडे पाश्चात्य देशांतील उद्योजक आणि व्यावसायिक अत्यंत स्वागतशील दृष्टीने पाहत असतात. एखाद्या विशिष्ट शोधाचा वापर वेगवेगळ्या क्षेत्रात कसा करता येईल याकडे त्यांचे बारीक लक्ष असते. तीक्ष्ण लेसर किरणांनी अभेद्य डोंगर फोडता येतो; हे ठाऊक झाले.

संगणकावरील मजकुराचे मुद्रण करण्यासाठी याच लेसर किरणांचा वापर करता येईल या कल्पनेचा पाठपुरावा करून ह्युलेट-पॅकार्डने लेसर प्रिंटर्स तयार केले. जगातील बहुतेक संगणक वापरणाऱ्या लोकांना एचपीचे हे प्रिंटर्स वापरावे लागतात. एक लाख चाळीस हजाराला आरंभी अल्पक्षमतेचा लेसर प्रिंटर मिळे. आता अत्यंत वेगवान (मिनिटाला २०-३०प्रती) देणारे आणि मोठी स्मृतिमंजुषा (मेमरी) असणारे प्रिंटर्स एचपी दर तीन महिन्यांनी बाजारात आणत आहे आणि भरपूर नफा मिळवत आहे. लेसर प्रिंटरची किंमत ३०/४०हजार रुपये असली तरी खरी कमाई छपाईसाठी लागणाऱ्या 'टोनर'मुळे होते. या टोनरच्या किंमती दोन ते चार हजार रुपये असतात. तीन हजार प्रती त्यावर निघू शकतात. काही वेळा प्रिंटरच्या किमतीपेक्षा जास्त रक्कम वर्षाला टोनरसाठी द्यावी लागते. शंभरदीडशे ग्रॅम टोनर पावडरची किंमत दीड-दोन हजार रुपये- यावरून त्यातील नफ्याची कल्पना येऊ शकेल. जगातील अग्रगण्य माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील संस्थांमध्ये मायक्रोसॉफ्ट, कॉंपॅक, एचपी, इंटेल यांचा आद्यक्रम लागतो, तो काही उगाच नाही. या कंपन्यांच्या शेअर्सचे भाव व नफ्याचे प्रमाण स्तिमित करणारे आहे.

प्रकाशनक्षेत्राच्या दृष्टीने बघितले तर या नव्या संगणकीय क्रांतीमुळे मुद्रित शब्दांची काही अंशी पीछेहाट होणे अपरिहार्य आहे. मुद्रित पुस्तकाची जागा कॉंपॅक्ट डिस्क-सीडी घेऊ लागतील, अशी शक्यता दिसते.

'ई-बुक्स' हा प्रकारही व्यावहारिक पातळीवर कसा सुलभ सोयीचा होईल याबद्दलचे प्रयोग चालू आहेत. अमेरिकेतील अग्रगण्य भयकथालेखक स्टिफन किंग यांच्या एका कादंबरीचे ई-बुक्सवरून प्रकाशन झाले; (छापील पुस्तकरूपाने ते प्रसिद्ध होणार नाही असे जाहीर करण्यात आले.) आणि पहिल्याच दिवशी पाच डॉलर्स भरून चार लाखावर वाचकांनी नावे नोंदवली. या घटनेचा मोठा गाजावाजा झाला. त्यानंतरही काही लेखकांनी आपली पुस्तके प्रथम संगणकावरच आणली. नोबेल पुरस्कार विजेता बेस्टसेलर लेखक अर्नेस्ट हेमिंग्वे याची २३ पुस्तके मिल अँड शूस्टर या प्रकाशनसंस्थेने इंटरनेटवर उपलब्ध करून देणार आहे. या संस्थेने आजवर सुमारे १२०० पुस्तके इलेक्ट्रॉनिक बुक फॉर्मच्या रूपात 'प्रसिद्ध'केली असून, भविष्यात या प्रकाराला मोठा वाव आहे असा तिचा आडाखा आहे. पाठ्यपुस्तके, कथाकादंबऱ्या, माहितीपूर्ण पुस्तके अशा वेगवेगळ्या प्रकारची पुस्तके या १२०० पुस्तकांच्या यादीत आहेत. त्यात मोठ्या वेगाने वाढ होत



राहील असे या प्रकाशनसंस्थेच्या ऑनलाइन विभागाच्या उपाध्यक्ष श्रीमती केट टेटलर यांनी जाहीर केले आहे. त्यांच्या मते ई-बुक्सनी अजून खऱ्या अर्थाने व्यावसायिक पातळीवर कारभाराचा शुभारंभ केलेलाच नाही; परंतु एकूण ग्रंथव्यवहारात ई-बुक्सना भविष्यकाळात मुद्रित पुस्तकांपेक्षा अधिक खप राहील अशी त्यांची भावना आहे. 'व्हायाकॉम इंक'चा एक उपक्रम म्हणून सिमन अँड शूस्टर ही संस्था इलेक्ट्रॉनिक पब्लिशिंगवर या पुढच्या काळात भर देणार आहे.

आरंभी ई-बुक्सच्या संदर्भात फारच अतिरंजित अपेक्षा लोकांनी केल्या होत्या, आणि त्यामुळे ग्रंथव्यवहारात आमूलाग्र क्रांती होईल अशी भाकिते केली होती. ती भाकिते एकूणच आर्थिक मंदीच्या संदर्भात फुसकी ठरली; अनेक डॉटकॉम कंपन्या दिवाळखोर बनल्या आणि ई-बुक्सच्या कल्पनेलाही त्यामुळे जबरदस्त फटका बसला. तथापि ही कल्पना त्यामुळे बाद ठरावी असे नाही, असे काही निरीक्षकांना वाटते. त्या उलट ज्युपिटर मिडिया मॅट्रिक्स या कंपनीतील ॲनॅलिस्ट डेव्हिड कार्ड याने काहीसा निराशावादी सूर लावला आहे. ''ई-बुक्सच्या वाढीबाबत काहीही भविष्यकालीन अंदाज व्यक्त करण्याचे काम आम्ही गेल्या दीड वर्षापासून टाळत आलो आहोत... या कल्पनेला आज तरी फार मोठा वाव आहे असे वाटत नाही''असे त्याने म्हटले आहे.

एओआय टाइम वॉर्नर इंकने मध्यंतरी ई-बुक्स क्षेत्रात पदार्पण केले होते; परंतु अल्पावधीतच तो नाद सोडून दिला होता. परंतु आता पुन्हा या क्षेत्रात काहीतरी करायला हवे म्हणून ई-बुक्स प्रकाशक संस्थांशी भागीदारीचे करार करण्याचा टाइमवॉर्नरचा प्रयत्न चालू आहे.

अमेरिकेचे माजी राष्ट्रपती रिचर्ड निक्सन यांचा व्हाइटहाऊसमधील एक सल्लागार जॉन डीन याने 'डीप थ्रोट'बाबत एक नवा सिद्धांत विकसित केला आहे. मुद्रित पुस्तकाच्या रूपात हा सिद्धांत प्रसिद्ध करण्याऐवजी 'दि डीप थ्रोट ब्रीफ'या नावाने ई-बुक्सच्या रूपात तो वाचकांपुढे ठेवण्याचा निर्णय जॉन डीनने घेतला असून, जूनमध्ये salon.com web साइटवर तो उपलब्ध होईल असे जाहीर केले आहे.

इंटरनेटच्या माध्यमातून अत्यंत अल्प खर्चात व थोडक्या वेळात जगभरच्या ग्राहकांपर्यंत पोचतो येते; त्यामुळे ई-बुक्सच्या माध्यमाचे माहितीतंत्रज्ञानातील सर्वच जाणकारांना आकर्षण वाटते. या माध्यमाच्या क्षमता अफाट आहेत याबद्दल त्यांच्या मनात कुठलीशी शंका नाही. मात्र अजून व्यावहारिकदृष्ट्या ही कल्पना सायीस्कर व सुलभपणे राबवण्याबाबत काही अडचणी आहेत.

ओपन ई-बुक्स फोरम'या संस्थेतर्फे ई-बुक्सच्या माध्यमाचा अमेरिकेत मोठा प्रचार चालू आहे आणि नव्या लेखकांनी प्रतिष्ठित प्रकाशन संस्थांचे उंबरठे झिजवण्याऐवजी ई-बुक्सच्या माध्यमातून आपल्या वाचकग्राहकांपर्यंत झटपट पोचावे अशी प्रचार मोहिम उघडली आहे. पर्यटनविषयक पुस्तके, धार्मिक पुस्तके, संदर्भग्रंथ वगैरे प्रकारातील पुस्तके आज मितीलाही इंटरनेटवर मोठ्या प्रमाणव्वर विकली जात आहेत. परंतु मध्यंतरीच्या डॉटकॉम वेबसाइटच्या फुगा फुटण्याच्या काळात सर्वांनाच हादरा बसला; त्यामुळे ई-बुक्सकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोनही बदलला. तथापि त्या मंदीतून आता पाश्चात्य देश बाहेर पडत आहेत; आणि तंत्रज्ञानाच्या नव्यानव्या सोयीसुविधांचा लाभ घेण्याची मानसिकता पुन्हा कार्यप्रवण होत आहे.

आरंभीच्या काळातील अतिरंजित अपेक्षा पूर्ण न झाल्याने या क्षेत्राबद्दल काही लोकांचा

भ्रमनिरास झाला हे खरे आहे; परंतु आता तो आरंभीचा धक्का पचवून धाडसी प्रकाशक नव्या उमेदीने ई-बुक्सकडे बघू लागले आहेत.

'ई-बुक्स' ही कल्पना कपोलकल्पित किंवा अव्यावहारिक आहे असे काही टीकाकार मानत आले आहेत; परंतु ती तशी नाही. ती पूर्णतया व्यावहारिक आणि सोयीस्कर आहे. प्रकाशकांनी मुद्रित पुस्तकाबरोबरच सीडी रॉमच्या रूपातील आणि ई-बुक्सच्या रूपातील पुस्तके भविष्यकाळात मुसंडी मारणार आहेत हे लक्षात घेऊन आपल्या व्यवसायाचे स्वरूप बदलण्याची तयारी दाखवायला हवी असा विचारप्रवाह इंग्लंड-अमेरिकेतील प्रकाशकांमध्ये सध्या जोर धरीत आहे. आपल्याला मुद्रित पुस्तके, पेपरबॅक्स पाहण्याची सवय आहे; यापुढे सीडीच्या रूपात वा इंटरनेटवर ऑनलाइन स्वरूपात पुस्तके बघण्याचीही आपली तयारी व्हायला हवी. स्वत:च्या पैशाने स्वत:ची पुस्तके काढण्याऐवजी 'स्वयंप्रकाशकां'ना तर इंटरनेटद्वारे आपले पुस्तक वाचकांपर्यंत पोचवणे सोपे ठरणार आहे.

भारतातही काही नव्या लेखकांनी आपली पुस्तके इंटरनेटवर 'टाकली' आहेत. भाषिक लेखकांनाही हा प्रकार सोयीचा ठरू शकेल. अर्थात मुद्रित स्वरूपातील पुस्तके हा आजतरी सर्वात सोयीस्कर व स्वस्त प्रकार आहे आणि येत्या दीडदोन दशकात तरी तोच प्रभावी राहणार आहे. परंतु आपली झेप नेहमी भविष्याकडे हवी.

संपादक





वयात येऊ पाहणाऱ्या मुलीच्या मनात पुरुषस्पर्शाबद्दल एकदा भीती बसली की...अतृप्त इच्छा व त्यातून होणारी मानसिक कोंडी अशी गुंतागुंतीची समस्या निर्माण होते.

एका ज्वलंत कौटुंबिक, सामाजिक समस्येचा वेध घेणारे प्रभावी नाटक.

**मनोम्यी** **लेखिका : सौ. मेधा तेलंग**

**किंमत : ६०रु.**

'जयवंत दळवी, चि. त्र्यं. खानोलकर यांच्या नाटकाची आठवण करून देणारं एक स्वतंत्र सामाजिक नाटक.'- **समीक्षक वि. भा. देशपांडे**

**पुस्तक मिळण्याचे ठिकाण**- श्री. माधव तेलंग, ४७८/अ, शनिवार पेठ,ओम अपार्टमेंट्स, पुणे- ३० फोन- ४४५६१३८

पुणे : रसिक साहित्य-फोन-४४५११२९, परेश एजन्सीज- फोन-४४५९१९०

मुंबई : आयडियल - फोन-४३०४२५४,मॅजेस्टिक दादर-फोन-४३०५९१४







## 'एनएसडी' बालरंगभूमिविषयक विशेष अभ्यासक्रम राबविणार

''राष्ट्रीय नाट्य विद्यालय (एनएसडी) पुढील शैक्षणिक वर्षापासून बालरंगभूमिविषयक विशेष अभ्यासक्रम सुरू करणार येणार आहे.'' असे या विद्यालयाचे उपसंचालक देवेंद्रराज अंकुर यांनी सांगितले.

'रंगमेळ' नाट्यमहोत्सवासाठी श्री. अंकुर पुण्यात आले होते. ''आमच्या विद्यालयात यंदा तृतीय वर्षाच्या अभ्यासक्रमात बालरंगभूमीचा समावेश करण्यात आला आहे. तथापि, त्या विषयात पुढील शैक्षणिक वर्षापासून स्पेशलायझेशनची सोय उपलब्ध करून दिली जाणार ओह. त्या दृष्टीने अभ्यासक्रम निश्चित करण्यात येत आहे. या विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण करणारे विद्यार्थी अध्यापनाच्या क्षेत्रात करिअर करू शकतील.'' असे ते म्हणाले.

''यंदा विद्यालयाने मुलांसाठी एक नाटक बसविले आहे. दिल्लीतील काही शाळांत त्याचे प्रयोगही सादर केले. या नाटकाला मुलांचा मोठा प्रतिसाद मिळाला. हे नाटक आम्ही महाराष्ट्र, गोव्यासह काही राज्यात सादर करणार आहोत.''

''शाळांच्या अभ्यासक्रमात रंगभूमीचा अंतर्भाव व्हावा म्हणून आमचे विद्यालय प्रयत्नशील आहे. या संदर्भात १९७७ मध्ये शिवराम कारंथ यांच्या समितीने एक अहवाल सादर केला होता. त्यानंतर १९८९ मध्ये हक्सर समितीनेही अहवाल सादर केला होता. मात्र, त्याबाबत फारशी कारवाई झालेली नाही. विद्यालयाने या संदर्भात मनुष्यबळ विकास मंत्रालय व राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेला (एनसीईआरटी) एक प्रस्ताव सादर केला आहे. शिक्षण हा विषय राज्यांच्या अखत्यारीतही असल्याने राज्यांच्या शिक्षणमंत्र्यांच्या परिषदेत आमच्या प्रतिनिधीला सहभागी होण्याची परवानगी द्यावी, अशीही मागणी आम्ही केली आहे.''

''शाळांमध्ये रंगभूमी हा विषय शिकविला गेल्यास मुलांच्या व्यक्तिमत्त्वाला चालना मिळेल. मुले अधिक विश्वासाने बदलत्या परिस्थितीला सामोरी जातील.'' असे ते म्हणाले.

## कर्मवीर भाऊराव पाटील चरित्राचे प्रकाशन

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवनचरित्रावर प्रकाशझोत टाकणारे 'दि बाउंटीफुल बॅनियन' या ग्रंथांचे प्रकाशन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान आणि मॅकमिलन पब्लिकेशनने संयुक्तरीत्या केले.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या मायेची सावली लाभलेले आणि त्यांच्या सान्निध्यात राहिलेले, बॅरिस्टर पी.जी.पाटील या ग्रंथाचे लेखक आहेत. रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून कर्मवीर

भाऊराव पाटील यांनी लक्षावधी घरांमध्ये शिक्षणाची प्रकाशकिरणे पोचवली. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी बॅरिस्टर पी.जी. पाटील यांना एका खेड्यातून रयत शिक्षण संस्थेत आणले. त्यांना शिकविले. त्यांना इंग्लंडला पाठविले. पी.जी.पाटील यांचे आयुष्य त्यांनी घडविले. सध्या पी.जी.पाटील हे रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष आहेत. कर्मवीर भाऊराव पाटील यांना जवळून पाहिल्याने बॅरिस्टर पाटील यांनी या ग्रंथात त्यांचे शिक्षणाविषयीचे विचार, त्यांची स्वप्ने, त्यांच्या कर्तृत्वाचे वेगवेगळे पैलू विस्ताराने दाखविले आहेत.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान आणि रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शरद पवार यांनी या महत्त्वाकांक्षी प्रकल्पात जातीने लक्ष घातले. रयतचे कार्याध्यक्ष डॉ.एन. डी.पाटील, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ.अनिल पाटील यांनी विशेष मदत केली.

मॅकमिलनचे प्रकल्पप्रमुख दिलीप लाठी यांनी सांगितले, ''बॅरिस्टर पाटील यांनी अत्यंत रसाळ भाषेत लिहिलेल्या या चरित्राच्या माध्यमातून कर्मवीरांचे विचार, तत्त्वज्ञान आणि शैक्षणिक कार्याची ओळख होऊ शकेल. या प्रकल्पात सहभागी होण्याचा बहुमान आम्हाला मिळाला, हे आम्ही आमचे भाग्य समजतो.''

## 'संस्कृती संभ्रम'चे प्रकाशन

''सत्तेच्या आणि राजकारणाच्या हुकूमशाहीपेक्षाही सध्याचे 'रोबोटिझम' व तंत्रज्ञानाची हुकूमशाही, मानवी संस्कृतीचा सर्वात मोठा धोका बनत आहे.'', असे मत सिंबायोसिसचे संचालक डॉ.शां.ब. मुजुमदार यांनी पुणे येथे व्यक्त केले.

डॉ.ग.ना.जोशी यांच्या 'संस्कृती संभ्रम'या ग्रंथांचे प्रकाशन गीता धर्म मंडळात डॉ. मुजुमदार यांच्या हस्ते झाले. या वेळी डॉ. शरच्चंद्र गोखले, बाळ गाडगीळ, म.के. ढवळीकर आदी उपस्थित होते.

डॉ.मुजुमदार म्हणाले, ''मानवाच्या उत्कर्षासाठी व भल्यासाठी संस्कृती कार्यरत असते. संस्कृतीमध्ये कितीही भिन्नता असली, तरी प्रत्येक संस्कृतीचा केंद्रबिंदू मानव असतो.''

संस्कृती आणि समाजविज्ञान या विषयावर बोलताना डॉ. गोखले म्हणाले, ''संस्कृती ही सामाजिक मूल्यांचे नैतिक परिमाण आहे. जेव्हा ही मूल्ये समाजाच्या वागण्यातून, प्रतिसादातून व्यक्त होतात, तेव्हा ती त्या समाजाची संस्कृती ठरते.''

## स्त्रियांनी स्वकर्तृत्वाने आव्हानांना सामोरे जावे

''जागतिकीकरणाची आव्हाने स्त्रियांच्या वाट्याला जास्त येणार आहेत, हे ओळखून आपल्यातील कर्तृत्वाच्या जोरावर त्यांचा मुकाबला करण्यासाठी सज्ज झाले पाहिजे,'' असे मत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या विद्या बाळ यांनी व्यक्त केले.

महिला उद्योजक संघटनेच्या सतराव्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित केलेल्या परिसंवादात 'जागतिक बाजारपेठ व महिला उद्योजिका' या विषयावर श्रीमती विद्या बाळ बोलत होत्या.

''स्त्री पुरुषात श्रेष्ठ कोण हा वाद करण्यापेक्षा बुद्धी व कर्तृत्वाच्या जोरावर स्त्रियांनी पुढे जाण्यासाठी तयार झाले पाहिजे. स्त्रिया कर्तृत्ववान आहेत. असंख्य क्षेत्रे त्यांनी काबीज केली आहेत. पूर्वीसुद्धा अशा स्त्रिया आपल्याकडे होत्या. पण सध्याच्या स्थितीतील बदल ध्यानात घेऊन अधिक



आत्मविश्वासाने त्याला सामोरे जाण्याची गरज आहे.''

देशातील पन्नास टक्के स्त्री-शक्तीचा वापर उन्नतीसाठी झाला, तर एक आशादायी चित्र निर्माण होऊ शकेल, असेही त्यांनी सांगितले.

विजया पाटील म्हणाल्या,''ज्ञान ही शक्ती असल्यामुळे स्त्रियांनी अधिक बुद्धिवादी बनले पाहिजे. जागतिकीकरणात टिकून राहण्यासाठी तिने आपल्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे. वेळेचा सदुपयोग, काटकसर, मनावरचा ताबा, योग्य नियोजन, कामावर प्रेम, दयाळूपणा या गोष्टी उपजतच स्त्रियांमध्ये असल्यामुळे त्यांनी उद्योगात आत्मविश्वासपूर्वक लक्ष घातले, तर त्या यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाहीत.'' जिथे महिलांना संधी दिली आहे, तिथे मंदीचे प्रमाण कमी झाले आहे, असेही त्यांनी नमूद केले.

## 'सातासमुद्रापार विचार पोचण्यासाठी इंग्रजी आत्मसात करावी'

''आपल्या मनातले विचार सातासमुद्रापलीकडे पोचावेत असे वाटत असेल, तर इंग्रजी भाषा आत्मसात केलीच पाहिजे,'' असे विचार कायदेतज्ज्ञ ॲड.भास्करराव आव्हाड यांनी व्यक्त केले.

प्रा.रतनलाल सोनग्रा यांनी लिहिलेल्या 'सोनजातक' या आत्मचरित्रपर ग्रंथाचा इंग्रजी अनुवाद प्रा.व्ही.जी.नंद यांनी केला आहे. डॉ.मा.प. मंगुडकर अध्यक्षस्थानी होते. हे पुस्तक सिग्नेट पब्लिकेशन्सने प्रकाशित केले आहे.

ॲड. आव्हाड पुढे म्हणाले, ''आत्मचरित्रात्मक लेखन करताना लेखकाचे जीवन व चरित्र एकत्र आले की सत्यापलाप होण्याची शक्यता असते; परंतु या पुस्तकात लेखक आपली सर्व कवचकुंडले काढून आपल्यासमोर उभा आहे. हे पुस्तक वाचल्यावर सामान्य माणूस काय करू शकतो याची कल्पना आपल्याला येते.''

प्रा. शिरीष चिंधडे म्हणाले, ''या पुस्तकात अनुवाद करताना काही त्रुटी राहिल्या आहेत; परंतु त्यात मूळ मराठी भाषेचा ओघ आणण्याचा प्रयत्न केला आहे. या लिखाणातून लेखकाने नगरचा इतिहास, भूगोल यांसह एकूण समाजपटच उभा केला आहे.''

## डॉ. अशोक केळकर यांचा सत्कार

''डॉ.अशोक केळकर यांनी केवळ भाषाशास्त्राचा अभ्यासच केला नाही, तर त्यांनी भाषेचे आणि समाजजीवनातील विविध क्षेत्रांचे नाते काय आहे, यावरही अधिकारवाणीने विपुल व उद्बोधक लिखाण केले,'' अशा शब्दांत ज्येष्ठ विचारवंत प्रा.ग.प्र.प्रधान यांनी डॉ.केळकर यांच्या कार्याचा गौरव केला.

डॉ. केळकर यांना 'पद्मश्री' मिळाल्याबद्दल मराठी अभ्यास परिषद आणि पुणे विद्यापीठाच्या मराठी, इंग्रजी, हिंदी, संस्कृत, तत्त्वज्ञान विभाग आणि संस्कृत प्रथम अध्ययन केंद्र यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या कार्यक्रमात डॉ.केळकर यांचा सत्कार करण्यात आला.

याच कार्यक्रमाला जोडून विद्यापीठात 'भाषिक नीती आणि व्यवहार' या विषयावर एक चर्चासत्रही आयोजित केले होते. या चर्चासत्राचे उद्घाटन हैदराबाद येथील इंग्रजी व विदेशी भाषा संस्थेचे माजी कुलगुरू डॉ.प्रमोद तलगिरी यांनी केले. डॉ.मिलिंद मालशे, डॉ.सुधाकर मराठे, डॉ. सुहास पळशीकर, डॉ. के.एस. राज्यश्री, डॉ.मो.गो.धडफळे, विश्वनाथ खैरे, प्रा. द.प. जोशी आदी

या चर्चासत्रात सहभागी झाले. डॉ. चद्रकांत बांदिवडेकर आणि प्रा.प्र.ना.परांजपे यांनी डॉ.केळकर यांची प्रकट मुलाखत घेतली.

प्रा.प्रधान म्हणाले, ''डॉ.केळकर भाषाशास्त्राचा अभ्यास करताना त्याच्या मूलतत्त्वात गेले. या मूलग्राही अभ्यासामुळेच त्यांची विद्वत्ता सर्वस्पर्शी ठरली. त्याचबरोबर भाषेचे आणि समाजजीवनाचे अतूट नातेही त्यांनी स्पष्ट करून दाखविले, हे त्यांच्या अभ्यासाचे ठळक वैशिष्ट्य. माझ्या मते 'पद्मश्री' हे केवळ निमित्त आहे. डॉ.केळकर यांच्या ज्ञानसाधनेचा आणि त्यानंतर त्यांना जी सिद्धी लाभली तिचाच हा गौरव आहे.''

डॉ.केळकर यांनी आपल्याला अभ्यासाच्या दिशा कशा खुणावीत गेल्या आणि त्यामुळे ज्ञानातला आनंद आपण कसा लुटत गेलो, हे स्पष्ट केले. ते म्हणाले, ''भाषा ही बहुपेडी म्हणजे जीवनाच्या प्रत्येक अंगाला स्पर्श करीत असते. कुतूहलामुळेच मी भाषेच्या अभ्यासाकडे वळलो. या अभ्यासातही कला असते आणि आपण तिचा शोध घेतला पाहिजे, हीच माझी भूमिका होती. कालिदासाच्या 'अविषयो नास्ति' या वचनाप्रमाणे भाषेच्या अभ्यासाकडे पाहिले, तर तिचे स्वरूप आपल्याला समजते. तिच्यातील सौंदर्यशिल्पाचीही जाणीव आपल्याला होते.''

## चौथीपाचवीच्या पाठ्यपुस्तकांची मुखपृष्ठे नव्या स्वरूपात

येत्या शैक्षणिक वर्षात इयत्ता चौथी, पाचवीत शिकणाऱ्या छोट्या दोस्तांना आकर्षक मुखपृष्ठ असलेली बालभारती, विज्ञान, गणिताची पुस्तके मिळणार आहेत.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम मंडळाच्या इयत्ता पहिली ते पाचवीसाठी क्षमताधिष्ठित अभ्यासक्रमानुसार ही पाठ्यपुस्तके तयार करण्यात आली आहेत.

१९९८ मध्ये मंडळाने इयत्ता चौथी व पाचवीसाठी या अभ्यासक्रमावर आधारित पाठ्यपुस्तके तयार केली. या पुस्तकांचे विद्यार्थी, पालक, शिक्षकांमधून जोरदार स्वागत झले. बालभारती, विज्ञान, गणित या विषयांची इयत्ता चौथी व पाचवीची १९९८ मध्ये काढलेली पाठ्यपुस्तके अधिक निर्दोष, दर्जेदार व्हावीत, यासाठी पाठ्यपुस्तक मंडळाने हाती घेतलेल्या 'सरस २००१'या प्रकल्पाअंतर्गत महाराष्ट्राच्या सर्व भागांतील प्राथमिक शिक्षक आणि विषयतज्ज्ञ यांच्याकडून वर्षभर प्रत्याभरण घेऊन संस्था व व्यक्ती पातळीवर संशोधन प्रयत्न हाती घेतला. शिक्षक, पालक याच्या सूचना, वृत्तपत्रांतून आलेली परीक्षणे या सर्वांचा विचार करून मंडळाने यंदा इयत्ता चौथी, पाचवीच्या गणित, विज्ञान व बालभारतीच्या पुस्तकांची सुधारित आवृत्ती तयार केली आहे. शिक्षकांचे अध्यापन नेमके आणि प्रभावी व्हावे, यासाठी पाठ्यपुस्तकात पाठांवरील प्रत्येक स्वाध्यायास क्षमता क्रमांक आणि गरज भासेल तेथे सूचनाही दिल्या आहेत. शिक्षकांबरोबरच पालकांनाही मुलांचा अभ्यास घेताना पुस्तकाची मदत व्हावी, असा प्रयत्न करण्यात आला आहे. नव्या स्वरूपाची ही पुस्तके अभ्यासताना वेगळा आनंद विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

इयत्ता पाचवीच्या बालभारतीच्या मुखपृष्ठावर व शेवटच्या पृष्ठावर प्रसिद्ध चित्रकार रवी परांजपे यांचे आकर्षक निसर्गचित्र छापले आहे. दोन्ही चित्रांबाबत श्री.परांजपे यांचे मनोगतही पुस्तकात दिले आहे. ही दोन्ही निसर्गचित्रे ग्रामीण जीवनातील आहेत.

इयत्ता चौथीच्या बालभारतीचेही मुखपृष्ठ बदलले आहे. अभ्यास करणारी व सहलीला निसर्गरम्य स्थळी आलेली मुले या पुस्तकाच्या मृखपृष्ठावर व शेवटच्या पृष्ठावर आहेत. इयत्ता चौथी



व पाचवीच्या विज्ञान विषयाचेही मुखपृष्ठ व शेवटचे पृष्ठ अधिक आकर्षक केले आहे. गणिताच्या पुस्तकावरील मृखपृष्ठात थोडासा बदल केला आहे.

यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून ही नव्या स्वरूपाची पुस्तके मुलांच्या हाती पडणार आहेत.

## 'ख्रिस्त माझ्यामध्ये तो दिसो' गीतसंग्रहाचे प्रकाशन

''कबीराची सहजता व त्याने सांगितलेले प्रीतीचे महत्त्व सामाजिक शक्तीची धारणा करू शकते. येशू ख्रिस्ताने याच प्रीतितत्त्वाचे व्यापक धर्मतत्त्वात रूपांतर केले. हेच प्रीतीचे मर्म प्रासादिक व ओघवत्या शैलीत 'ख्रिस्त माझ्यामध्ये तो दिसो' या गीतसंग्रहात व्यक्त झाले आहे.'' असे प्रसिद्ध लेखक डॉ.दामोदर खडसे यांनी सांगितले.

अनुबंध प्रकाशनतर्फे जयंतकुमार त्रिभुवन यांच्या या गीतसंग्रहाचे प्रकाशन झाले. भारतीय क्रिकेट निवड समितीचे अध्यक्ष चंदू बोर्डे व उर्वरित वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष उल्हास पवार हे प्रमुख पाहुणे होते.

सध्याच्या अशांत व जातीय वैमनस्याने भरलेल्या परिस्थितीत ख्रिस्ताच्या क्रियाशील प्रीतीचा संदेश सर्वत्र पोहोचणे आवश्यक आहे असे श्री.पवार यांनी सांगितले.

## अक्षरप्रतिष्ठानचे सहावे जिल्हा साहित्य संमेलन

''मराठीचा प्रसार हा साहित्यिकांप्रमाणे सर्वांनीच करायला हवा. लेखकांप्रमाणेच वाचकही सतर्क असावा. त्यातूनच लेखक-वाचक संवाद अधिक चांगला घडेल. त्या दृष्टीने संमेलनाऐवजी कार्यशाळा घ्याव्यात. त्यातून एक नवी वाचक चळवळ निर्माण होईल.'' असा विश्वास लेखिका प्रा.छाया महाजन (औरंगाबाद) यांनी व्यक्त केला.

'अक्षरप्रतिष्ठा'च्या सहाव्या जिल्हा मराठी साहित्य संमेलनाचा समारोप डॉ.ना.गो. नांदापूरकरनगरात झाला. संमेलनाध्यक्ष प्रा.भास्कर कुलकर्णी होते. प्रमुख पाहुणे म्हणून माजी राज्यमंत्री रावसाहेब जामकर, स्वागताध्यक्ष ॲड.न.चि.जाधव, लक्ष्मीकांत देशमुख, एकनाथ मोरे उपस्थित होते.

प्रा. महाजन पुढे म्हणाल्या, की आपल्याला साहित्याची मोठी परंपरा लाभली आहे. संमेलनाच्या स्वरूपात ती वाढली आहे. परभणी जिल्ह्यात साहित्य चळवळ अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनानंतर चांगलीच वाढली; परंतु संमेलनांमध्ये तसेच साहित्यामध्ये राजकारण शिरत आहे. पुरस्काराच्या लालसेने अनेक प्रकार यातून घडू लागले आहेत. त्यामुळे साहित्यक्षेत्राचा प्रवाहच बदलू लागला आहे.

## डॉ. अशोक कामत - एकसष्टीनिमित्त स्नेहमीलन सोहळा

संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. अशोक कामत यांच्या एकसष्टीनिमित्त गुरुकुल प्रतिष्ठानतर्फे आयोजित स्नेहमीलन सोहळा एका आगळ्यावेगळ्या वातावरणात ११ मे रोजी साजरा करण्यात आला.

आबासाहेब गरवारे महाविद्यालयाच्या सभागृहात झालेल्या या सोहळ्याची सुरुवात कविता खरवंडीकर यांच्या भजनाने झाली. त्यांनी गुरू-शिष्य संवादाची भजने सादर केली. त्यानंतर संत नामदेव अध्यासन कार्याशी संबंधित चार ग्रंथांचे प्रकाशन करण्यात आले. 'अभ्यासपर्व' या ग्रंथांचे

प्रकाशन वि.रा.करंदीकर यांच्या हस्ते, ‘शोधयात्रा’चे प्रकाशन बाळासाहेब भारदे यांच्या हस्ते, ‘सद्भाव’चे प्रकाशन कृ.वा.मोडक यांच्या हस्ते तर ‘अध्यासनाची संकल्पना आणि उच्च शिक्षणातील समस्या’ या ग्रंथांचे प्रकाशन ग.वा.तगारे यांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमाला अभ्यासक-उपासक, सहयोगी आणि संशोधक अध्यापक, सन्मित्र-सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते; तसेच पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.अशोक कोळस्कर, माजी कुलगुरू श्रीधर गुप्ते, डॉ.ह.वि. सरदेसाई, ज्योत्स्ना देवधर, द.ना.धनागरे, डॉ.वि.मा.बाचल, डॉ.चंद्रकांत बांदिवडेकर, आर.व्ही.कुलकर्णी, कृष्णकांत अष्टेकर, अरविंद अवचट, डॉ. श्री.गो.देशपांडे, प्रा.सतीश बडवे, डॉ.अ.रा. तोरो, प्रभाकर स्वामी, राम पारुंडेकर, कृष्ण शिवराम हेगडे आदी मान्यवर उपस्थित होते.

## ‘मी नथुराम गोडसे...’बाबत कायदेशीर सल्ला घेणार : भुजबळ

‘मी नथुराम गोडसे बोलतोय’चे नाट्यप्रयोग सादर करण्यावर बंदी घालण्याच्या खुद्द लेखक प्रदीप दळवी यांच्याच मागणीबाबत गृहविभाग कायदेशीर सल्ला घेणार असून, मुख्यमंत्र्यांकडेही सामान्य प्रशासन विभागामार्फत कारवाई करण्याबाबत विनंती करण्यात आली आहे, असा खुलासा उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी केला आहे.

नाटकावर बंदी घालण्याची मागणी करण्यात येऊनही सरकार थंड असल्याची टीका झाल्याने उपमुख्यमंत्र्यांनी खुलासा केला आहे. दळवी यांनी उपमुख्यमंत्र्यांना २९ एप्रिलला पत्र पाठविले. त्यात त्यांनी म्हटले होते, ‘देशाचे भविष्यात आणखी तुकडे होऊ नयेत आणि हिंदू-मुस्लिम दोन्ही जमातीत सलोखा निर्माण व्हावा, या उद्देशाने मी नाटक लिहिले. राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या विरोधात जनमत तयार व्हावे, या पद्धतीने सादरीकरण मला अपेक्षित नव्हते. राष्ट्रपित्याची कुचेष्टा करणारे प्रयोग सध्या सादर केले जात आहेत. त्यामुळे या नाटकावर बंदी घालण्यात यावी.’

हे पत्र मिळाल्यावर भुजबळ यांनी तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश गृहविभागाला दिले. काही भाग सामान्य प्रशासन विभागाशी निगडित असल्याने त्याबाबत मुख्यमंत्र्यांना विनंती करण्यात आली आहे. नाटकाच्या प्रयोगासाठी उच्च न्यायालयाने परवानगी दिली आहे. त्यामुळे कायदेशीर सल्ला घेऊन कारवाई करावी लागणार आहे, असे भुजबळ यांनी स्पष्ट केले.

## ‘कार्यकौशल्यावर आधारित शिक्षण हाच समर्थ पर्याय’

‘‘एकविसावे शतक हे बदलाचे शतक म्हणून ओळखले जाणार असून, तीव्र स्पर्धा आणि झपाट्याने होणारे बदल याला सामोरे कसे जायचे, हे शिक्षणक्षेत्रासमोरचे सर्वांत मोठे आव्हान आहे. अशा परिस्थितीत कार्यकौशल्यावर आधारित शिक्षण हाच समर्थ पर्याय ठरू शकेल.’’ असा आशावाद ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ व लातूरचे नगराध्यक्ष जनार्दन वाघमारे यांनी व्यक्त केला.

एकलव्य प्रकाशनाच्या सहाव्या वर्धापनदिनानिमित्ताने डॉ.वाघमारे यांचे ‘भविष्यातील शिक्षण’या विषयावर व्याख्यान झाले.

डॉ. वाघमारे पुढे म्हणाले,‘‘पूर्वी शिक्षणाचे माध्यम केवळ गुरू हेच होते. आता अनेक माध्यमे निर्माण झाली आहेत. पूर्वी एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिक पद्धतीने ज्ञान संक्रमित होत असे. छपाईचा शोध लागल्यावर ज्ञानाचे सार्वत्रिकीकरण झाले. आधुनिक शिक्षण ही इंग्रजांची देणगी



आहे. चौदा ते अठराव्या शतकापर्यंत युरोपात ज्ञानाच्या क्षेत्रात मोठी लाट निर्माण झाली. प्रबोधनाच्या या तेजोमय लाटेतून अनेकजण पुढे आले. एकोणिसाव्या शतकात विज्ञानाचे वारे सुरू झाले. या शतकात भारतातच नव्हे तर जगात मोठमोठी माणसे निर्माण झाली. विसाव्या शतकात तर विज्ञानाने क्रांतीच केली. एकविसावे शतक हे मोठमोठ्या बदलांचे राहणार आहे. आता संशोधनावर भर द्यावा लागणार आहे. आपण बाहेर किती वस्तू निर्यात करतो, यावर आपले सामर्थ्य ठरणार आहे.’’

शिक्षणाच्या बाबतीत आपण पाश्चात्त्यांपेक्षा चाळीस वर्षांनी मागे आहोत, असे मत व्यक्त करून डॉ. वाघमारे म्हणाले, ‘‘यापुढे शिक्षक नव्हे, तर शिकणारा महत्त्वाचा ठरणार आहे. तहहयात शिक्षण आणि शिकणारा समाज या बाबी महत्त्वाच्या आहेत. आपल्याकडे राष्ट्रीय उत्पन्नाच्या तीन टक्के भाग शिक्षणावर खर्च होतो. अन्य काही देशांत हे प्रमाण सात ते आठ टक्के आहे.’’

## फासेपारधी, कंजारभाट मुलांना शिक्षणाची संधी

पुणे जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ. माधव सानप यांच्या पुढाकारातून पुणे जिल्ह्यातील फासेपारधी व कंजारभाट या जातीतील २५ छोटी मुले आळंदीतील ज्ञानेश्वर प्राथमिक विद्यामंदिरात शिक्षणासाठी दाखल झाली. पहिल्याच उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी ही मुले बारामतीत आली. तेव्हा त्यांच्यामध्ये लक्षणीय बदल जाणवला.

ज्या ओठांवर परंपरागत सवयीने लहान वयात सराईतपणे शिव्या येत असत, त्याच मुलांच्या ओठांवर आता संस्कृत श्लोक आणि इंग्रजीतील कविता येतात! शिक्षणाचा गंधही नसलेल्या या चिमुरड्या मुलांच्या राहणीमानात अवघ्या एक वर्षात आमूलाग्र बदल झाला.

जन्मत:च गुन्हेगार म्हणून शिक्का घेऊन येणाऱ्या या छोट्या मुलांवर हा शिक्का पडू नये, त्यांना शिक्षण मिळावे व गुन्हेगारी क्षेत्राकडे त्यांची वाटचाल होऊ नये यासाठी डॉ.सानप यांनी ‘ध्यास फाउंडेशन’या संस्थेच्या मदतीने फासेपारधी, कंजारभाट या जातीतील २५ मुलांना दत्तक घेऊन त्यांना आई-वडिलांपासून दूर एका चांगल्या वातावरणात वाढविण्याचा निर्णय घेतला. या मुलांचा खर्च करण्यासाठी काही दानशूर मंडळी पुढे सरसावली आणि या मुलांनी शाळेत अभ्यासाचे धडे घेण्यास सुरवात केली.

एक वर्षानंतर सुट्टीसाठी जेव्हा ही मुले त्यांच्या पालकांकडे आली आणि एकसुरात इंग्रजी कविता, संस्कृत श्लोक, मराठी गाणी म्हणू लागली, तेव्हा त्यांचे अशिक्षित पालक थक्क झाले. ही आपलीच मुले आहेत का, असा प्रश्न पडावा, एवढा त्यांच्यात बदल झालेला आहे.

सुरुवातीला या मुलांना शाळेत पाठवायला तयार नसलेले त्यांचे पालक आता आपली दुसरी मुले या शाळेत घ्यावीत, यासाठी मागे लागली असल्याचे या प्रकल्पाचे दुसरे समन्वय, भटके विमुक्त महासंघाचे अध्यक्ष अविनाश गायकवाड यांनी सांगितले. जी मुले शाळेत जाण्यास तयार नाहीत, त्यांचे पालक त्यांना ‘शाळेत जा’ असे म्हणताना दिसतात.

ज्यांच्या सात पिढ्यांना शिक्षण अणि शाळा याचा साधा गंधही नाही, अशा गुन्हेगारी पार्श्वभूमी असणाऱ्या या कुटुंबातील ही पहिलीच पिढी आता शिक्षण घेत आहे. शिक्षणामुळे माणसात किती आमूलाग्र बदल होतो, याचे हे मूर्तिमंत प्रतीक आहे. ज्या कुटुंबात ‘शिक्षण’ हा विषयच वर्ज्य होता, त्या कुटुंबात आता मुलांना या शाळेत घालण्याची चढाओढ सुरू आहे.

माणसे मुळात गुन्हेगार नसतात, शिक्षणामुळे त्यांची गुन्हेगारीमानसिकता बदलते, त्यामुळे या मुलांना शिक्षण दिल्याशिवाय त्यांच्यात बदल होणार नाही, या उद्देशाने डॉ.सानप व त्यांच्या सहकाऱ्यांनी हा उपक्रम सुरू केला असून, आता त्याचे दृश्य परिणाम दिसू लागले आहेत.

## 'शैक्षणिक धोरणात बदलासाठी जाणकारांनी अहवाल द्यावा.'

''सध्याच्या शैक्षणिक धोरणात बदल सुचविण्यासाठी किमान पाचशे जाणकार शिक्षणप्रेमींनी संस्थात्मक स्वरूपात एकत्र येऊन शासनास अहवाल सादर करावा; तसेच प्रस्तावित सुधारणांचा पाठपुरावा करावा,'' असे आवाहन पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. देवदत्त दाभोळकर यांनी केले.

पालकनीती परिवारातर्फे मध्यप्रदेशातील होशंगाबाद विज्ञान शिक्षण कार्यक्रमाला 'सामाजिक पालकत्व पुरस्कार' प्रा.दाभोळकर यांच्या हस्ते देण्यात आला, त्याप्रसंगी ते बोलत होते. संस्थेच्या वतीने कमल नेहरू आणि राजेश खिंदरी यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

प्रा.दाभोळकर म्हणाले ''पाश्चिमात्य देशांप्रमाणेच आपल्या देशातही शिक्षणातील बदलांकडे व्यावसायिक दृष्टिकोनातून पाहणे गरजेचे आहे. अन्य राज्यांतील अशा संस्थांचा आदर्श महाराष्ट्राने घ्यावा.''

सत्काराला उत्तर देताना कमल नेहरू म्हणाले,''पुणे शहरात एकलव्य व अक्षरनंदच्या माध्यमातून मिळणारा प्रतिसाद व अन्य संस्थांचे सहकार्य यामुळे आपली संस्था पुरस्कारास पात्र ठरली.''

पालकनीती मासिकाचे लेखक अरविंद वैद्य, प्रकाश बुरटे, रेणुताई गावस्कर यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संपादक मंडळातील डॉ.विनय कुलकर्णी यांनी केले. मासिकाच्या संपादक संजीवनी कुलकर्णी यांनी 'पालकनीती'च्या प्रगतीचा आढावा घेतला.

## भिंगातून वाचावी लागणारी छोटी भगवद्‌गीता

कर्मविपाकाचा सिद्धान्त मांडणाऱ्या भगवद्‌गीतेच्या 'भारदस्त' ग्रंथराजाची सर्वांत लहान आवृत्ती काढण्याच्या ईर्ष्येने सुमारे पाऊण शतकापूर्वी छपाई, बांधणी यांच्या कारागिरीचा एक उत्कृष्ट नमुना घडला. केवळ दोन ग्रॅम वजनाची ही गीता असून तिला सोन्याचा मुलामा दिलेली चामड्याची बांधणी आहे. तसेच, ही गीता ठेवण्यासाठी बहिर्गोल भिंगासहित चांदीची डबी आहे. विष्णूच्या दहा अवतारांची चित्रे असलेली ही 'पंचरत्न गीता' तळहातावर ठेवली असता २.५ सें.मी. लांबीची, १.०५ सें.मी. रुंदीची व ०.७५ सें.मी. जाडीची आहे.

साताऱ्च्या भस्मे कुटुंबियांकडे असलेली श्रीमत् भगवद्‌गीतेची ही प्रत बडोदा संस्थानच्या गायकवाड कुटुंबियांकडून ७०वर्षांपूर्वी भेट म्हणून देण्यात आली होती. गीतेची ही सर्वात लहान प्रत असावी.

## व्यक्तिमत्त्वविकास होण्यासाठी वाचनाची आवड हवी

मनाची मशागत, आविष्काराची क्षमता, प्रगल्भता आणि व्यक्तिमत्त्वाचा विकास वाचनामुळे होत असल्याने लहान मुलांसह तरुणांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्याचा निर्धार वाङ्मय चर्चा



मंडळाच्या कार्यशाळेत करण्यात आला.

वाचक खुप काही वाचतात, पण त्या वाचनाला नक्की दिशा नसते. किती व कसे वाचावे तसेच वाचलेले लक्षात कसे ठेवावे याचे शास्त्रशुद्ध ज्ञान आणि वाचनाच्या संदर्भात प्रवास कोठून कोठे, कसा, कशासाठी या पैलूंच्या संदर्भात दोन दिवसांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

उद्‌घाटनपर सत्रात 'वाङ्मय परिचय'या विषयावर विजय कुवळेकर यांचे भाषण झाले. नंतर डॉ.प्राची जावडेकर व डॉ.सुप्रिया अत्रे यांचे 'वाचन तंत्र' यावर भाषण झाले. आणि 'वाचन- निकष आणि निवड' या विषयावर माधव वझे यांनी वाचकांशी संवाद साधला.

मुलांमधील वाचनाचे प्रमाण हल्ली कमी होत चालले आहे. त्यातच दूरचित्रवाणी माध्यमामुळे वाचनापेक्षा पाहण्यावर लक्ष केंद्रित झाल्यामुळे वास्तव जीवनाशी नातं तुटत चालले आहे. पालक आणि मुले, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील संवादही कमी आहे. याचा भावी पिढीवर संवेदनशीलता, निरीक्षणशक्ती, विचारक्षमता, संवाद थांबणे असा दुष्परिणाम होत आहे. चांगले संस्कार व विचारांची व्यापकता निर्माण करण्यासाठी लहान मुले व तरुणांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्याची गरज आहे.

तिसरी, चौथी आणि पाचवीतील विद्यार्थ्यांना वाचनाचे धडे देण्याबरोबरच शाळांमध्ये पूर्वीप्रमाणे पुन्हा वाचनाचा तास सुरू करावा असे सुचवले गेले.

चांगल्या वाचनातून प्रगल्भ माणूस निर्माण होतो आणि आज अशा माणसांची आपल्याला गरज आहे. सध्या परमताचा आदर कमी झाला आहे. एकमेकांना समजावून घेऊन एकोप्याने जगणे कमी झाले आहे. सहनशीलता आणि वैचारिक बळ कमी होत आहे, ही वस्तुस्थिती आहे.

मूलभूत मन घडत नसेल तर समाज कसा असेल याची ही झलक आहे. त्यामुळे चांगले, निवडक, जाणीवपूर्वक, मूलभूत आणि दिशा ठेवून गांभीर्याने वाचन करण्याची गरज आहे, असे सांगण्यात आले. दूरचित्रवाणीवर दाखविल्या जाणाऱ्या मालिका, त्यातील हिंसाचार, त्याचा मुलांवर होणारा परिणाम, वाचनापेक्षा पाहण्यामुळे होणारे दुष्परिणाम, त्यामुळे समाजात निर्माण झालेली निष्क्रियता, पालक-मुले यांच्यातील कमी हात चाललेला संवाद आणि यासाठी वाचनाची गरज याचा उहापोह कुवळेकर यांनी या वेळी केला.

भाषेतून संस्कृती वाहत असते. आज भाषेपासून आपण तुटतो आहोत, उद्या संस्कृतीपासून तुटण्याची भीती आहे. भाषा, आचार, विचार या पातळीवर पाश्चात्यांचे अनुकरणही नीट न करता येणारी त्रिशंकू पिढी निर्माण करतो की काय अशी शंका आहे.

पुस्तक व आयुष्यातील कोरी जागा वाचून ती भरणे याचा जवळचा संबंध आहे. अशी कोरी जागा वाचता आली तर त्याचे महत्त्व समजू शकेल, असे वक्त्यांनी नमूद केले.

## भौतिकशास्त्राची गोडी लावण्यासाठी कॉमिक्स!

कॉमिक्स म्हणजे अतर्क्य साहसांची मालिका आणि जोडीला विनोदाची पखरण. मग ती अतर्क्य साहसे टारझन, फँटम, बॅटमॅन, सुपरमॅन, स्पायडरमॅनची असोत की बालवीर टिनटिनची असोत... जंगलबुकमधल्या जंगलातली अनोळखी वळणं असोत...सारेच अतर्क्य. कॉमिक्सची

तर्काच्या चौकटीत छाननी करण्याचा पहिलावहिला प्रयत्न मिनेसोटा विद्यापीठातील भौतिकशास्त्राचे प्राध्यापक जिम कॅकालिओज करीत आहेत.

प्रा.कॅकालिओज १९८८पासून शालेय विद्यार्थ्यांना भौतिकशास्त्र शिकवीत आहेत. त्यांना स्वत:ला कॉमिक्स वाचण्याचा छंद आहे. ही कॉमिक्स वाचता वाचताच, या पुस्तकांचा भौतिकशास्त्राची गोडी लावण्यासाठी उपयोग करता येईल, असा विचार त्यांच्या मनात डोकावला. त्यांनी तसा प्रयोग करून पाहिला. कॉमिक्समधील साहसे शास्त्रीय कसोटीवर खरी होऊ शकतात काय, याचा शोध घेण्यास त्यांनी विद्यार्थ्यांना प्रवृत्त केले. भौतिकशास्त्राच्या कसोट्यांवर कॉमिक्समधल्या कोणत्या गोष्टी शक्यतेच्या कक्षेत आहेत आणि कोणत्या नाहीत, याचा शोध घ्यायला त्यांनी विद्यार्थ्यांना प्रवृत्त केले. यामुळे विद्यार्थ्यांना शिकण्यात अधिक गोडी वाटू लागली आणि कॉमिक्सकडेही ती प्रथमच वेगळ्या दृष्टीने पाहू लागली, असे प्रा. कॅकालिओज यांना आढळून आले.

१९७३च्या स्पायडरमॅनच्या कॉमिक्समध्ये पीटर पार्कर या व्यक्तिरेखेची प्रेयसी ग्वेन हिला खलनायक पुलावरून ढकलून देतो. ती खाली नदीत कोसळत असतानाच स्पायडरमॅन झेपावतो पण ग्वेन पाण्यावर आदळलेली असते. स्पायडरमॅन तिला बाहेर काढतो तेव्हा त्याला धक्काच बसतो. ग्वेन दगावलेली असते. स्पायडरमॅनला धक्का बसतो पण प्रा. कॅकालिओज यांना मात्र आश्चर्य वाटत नाही. कारण ताशी १५३ किलामीटर या वेगाने अचानक खाली कोसळलेल्या या नायिकेवर पडलेले गुरुत्वीय बल लक्षात घेता न्यूटनच्या गतीच्या दुसऱ्या नियमानुसार तिची मान तुटणे आणि ती दगावणे साहजिकच होते, असा निष्कर्ष प्राध्यापकांनी काढला. इतकेच नाही तर हा मृत्यू कसा ओढवला, हा प्रश्नच त्यांनी विद्यार्थ्यांपुढे ठेवला होता.

क्रिप्टन या ग्रहावरून आलेल्या सुपरमॅनची शक्ती विलक्षण होती. तो एखादी इमारत उचलू शकत असे. त्याचा ग्रह फुटल्याने सुपरमॅन पृथ्वीवर आला होता, या गोष्टीचीही त्यांनी छाननी केली तेव्हा भौतिकशास्त्राच्या कसाटीवर लेखक अचूक आहे, असे त्यांना आढळले. जो माणूस एखादी इमारत उचलू शकतो याचाच अर्थ त्याच्या ग्रहावरील गुरुत्वाकर्षण पृथ्वीपेक्षा कमालीचे अधिक असले पाहिजे. याचाच अर्थ त्या ग्रहाचा गाभा अतिघन व अतिशय अस्थिर असला पाहिजे. असा गाभा असलेला ग्रह फुटणे हे शास्त्रीय कसोट्यांवरही योग्यच आहे, असे प्रा.कॅकालिओज यांनी नमूद केले आहे. याचप्रमाणे स्पायडरमॅनच्या जाळ्याची ताण सहन करण्याची शक्तीही विलक्षण आणि पोलादाच्या तोडीची असली पाहिजे, असाही निष्कर्ष त्यांनी काढला आहे.

## वाचकांनी जागरुकतेचा हक्क बजावावा - प्रतिभा रानडे

विविध विषयांवरील वाचन करून संपन्न जीवनानुभव मिळविण्याबरोबरच जे वाचले आहे त्यावर स्पष्ट मत मांडावे आणि जागरूक वाचकाचा हक्क बजावावा, असे आवाहन ज्येष्ठ लेखिका प्रतिभा रानडे यांनी केले.

'वाङ्मय चर्चा मंडळा'तर्फे आयोजित वाचक कार्यशाळेत 'वाचन उपयोजिता'या विषयावर त्या बोलत होत्या.

काय व कसे वाचावे याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी आणि लेखकांशी खुला संवाद साधण्याची संधी मिळवून देण्यासाठी 'वाचकमंच'ची स्थापना करण्यात आली.

वाचनसंस्कृतीशिवाय पर्याय नाही. केवळ पुस्तकेच न वाचता, एखादी कलाकृती, चित्रपट



इतकेच नव्हे, तर माणसं वाचणे हाही एक महत्त्वपूर्ण अनुभव आहे, असे सांगून रानडे म्हणाल्या की, वाचनाने माहिती मिळते, ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात, आपल्याला किती ज्ञान आहे, याची जाणीव होऊन स्वयंभान येते.

वैचारिक, बौद्धिक आणि भावनिक पातळीवर स्वयंमूल्यांकन करण्याची जाण येते, म्हणूनच मुलांना विविध विषयांवरील वाचन करण्यास प्रोत्साहित करावे. नकाशे, शब्दकोश, संदर्भकोश आदींच्या माध्यमातून त्यांना वाचनाची गोडी लावावी. सुजाण नागरिक, समाज आणि पर्यायाने देश बांधला जाण्यासाठी वाचन महत्त्वाचे आहे. आधुनिकतेच्या काळात नाती, जाणिवा, नवीन पिढीच्या संवेदना बदलत आहेत. या काळात वाचनसंस्कृतीनेही कालानुरून बदल करणे आवश्यक आहे. त्यासाठी नवीन पिढीला मार्गदर्शन करावे, असे मतही त्यांनी या वेळी व्यक्त केले.

लिपीचा विकास झाला, तशी वाङ्मय जतन करण्याची व पर्यायाने ग्रंथालयाची गरज भासली. प्रत्यक्ष ग्रंथालयात गेले नाही, तरी प्रत्येकाचा व्यक्तिगत पुस्तक संग्रह असतोच. म्हणूनच वाचक आणि ग्रंथालय संस्कृती यांचे अतूट नाते आहे.

## किसनमहाराज साखरे यांनी सामान्यांना वेदान्त समजावून सांगितला

ह.भ.प. किसनमहाराज साखरे यांनी सर्वसामान्यांना वेदान्त समजावून सांगितला, असे मत ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत बाळासाहेब भारदे यांनी व्यक्त केले.

श्रीक्षेत्र आळंदी किसनमहाराज साखरे कृतज्ञता सोहळा समितीतर्फे कृतज्ञता ग्रंथाचे प्रकाशन उच्च तंत्रशिक्षणमंत्री दिलीप वळसे-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. शिक्षण राज्यमंत्री राजेंद्र शिंगणे, गणेशशास्त्री द्रवीड, ह.भ.प. बाळासाहेब बडवे, आमदार उल्हास पवार, आमदार जयदत्त क्षीरसागर, माजी आमदार डॉ.अरविंद लेले श्री संत ज्ञानेश्वर संस्थानचे विश्वस्त सारंग जोशी आदी उपस्थित होते.

माईर्स एमआयटी विश्वशांती केंद्रातर्फे साखरे यांचा सत्कार डॉ.विश्वनाथ कराड यांच्या हस्ते करण्यात आला. भारदे म्हणाले की, साखरे महाराज गृहस्थ असून, व्रतस्थ आहेत. ज्ञान, भक्ती, कर्म या तीन गुणांचा संगम साखरेमहाराज त्यांच्यात झाला आहे.

भौतिक प्रगती झाली असली, तर मानवाला अद्याप अध्यात्मिक शांती प्राप्त झाली नाही. मर्यादित साधने व अमर्यादित गरजा यांच्या कात्रीत माणूस सापडला असल्याचे वळसे-पाटील यांनी नमूद केले. डॉ.कराड यांनी प्रास्ताविक केले. तर ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ.विजय भटकर यांनी आभार मानले.

## रामकृष्ण मोरे यांच्या हस्ते काव्यसंग्रहाचे प्रकाशन

नवी सांगवी येथील सुयश प्रकाशनच्या वतीने ज्ञानेश्वर कोळी यांच्या 'घन दाटलेले' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री रामकृष्ण मोरे यांच्या हस्ते दि.११ मे रोजी झाले. सुयश प्रकाशनाचे सुनील यादव तसेच रुपाली अवचरे यांनी स्वागत केले. पिंपरी महापालिकेचे विरोधी पक्षनेते श्रीरंग बारणे, बंधुता प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रकाश रोकडे आदी उपस्थित होते. कवी कोळी यांचे जगणे माझे, आयुष्याच्या वाटेवर, आकाश पेलताना असे कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत.

## श्री समर्थ प्रकाशनच्या वतीने तीन पुस्तकांचे प्रकाशन

श्री समर्थ प्रकाशन यांच्या वतीने नुकतीच तीन पुस्तके एकाच वेळी प्रकाशित करण्यात आली. त्यामध्ये सुधीर सुखटणकर लिखित 'इहलोकीची यात्रा', विजय तरवडे लिखित 'दोस्त माझा मस्त' व 'प्रेषित' या दोन पुस्तकांचा समावेश आहे. डॉ.प्र.ल.गावडे यांच्या अध्यक्षतेखाली हा प्रकाशन समारंभ झाला. पुस्तकांचे प्रकाशन ग्रंथपाल अनंत जोशी, मुद्रितशोधक गांगण व विनोदी लेखक मुकुंद टाकसाळे यांच्या हस्ते करण्यात आले. श्री समर्थ प्रकाशनचे संपादक नीतिन केळकर यांनी प्रास्ताविक केले. चित्रकार मंगेश तेंडुलकर, 'केसरी गर्जने'च्या संपादिका सौ. गौरी टिळक, मंगला गोडबोले इ. साहित्यिक उपस्थित होते.

## 'व्हर्चुअल एडिटर'

अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठातील संगणक विज्ञान विभागाने 'व्हर्चुअल एडिटर' जन्माला घातला असून तो इंटरनेटवर आपल्या कामावर रुजूही झाला आहे. अजून प्रायोगिक पातळीवर असलेला हा प्रतिसृष्टीतील संपादक सुमारे १३ वृत्तस्रोतांतून बातम्या निवडतो आणि त्यांचे पुनर्लेखन करून स्वत:चे वार्तापत्र तयार करतो.

याहू, एबीसी न्यूज, सी एनएन, रॉसटर्स, लॉस एन्जलिस टाइम्स, सीबीएस न्यूज, कॅनेडियन ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशन, व्हर्चुअल न्यूयॉर्क, वॉशिंग्टन पोस्ट, वायर्ड, यूएसए टुडे आदी १३ व्हर्च्युअल वृत्तवाहिन्यांतील बातम्या निवडण्यासाठी हा 'कोलंबिया न्यूज ब्लास्टर' कृत्रिम बुद्धिमत्ता वापरतो.

या संपादकाला जन्माला घालणारे वैज्ञानिक म्हणतात की हा 'व्हर्चुअल एडिटर'मानवी पत्रकारांची कधीच जागा घेऊ शकणार नाही, कारण माणसांत अर्थ लावण्याची आणि विश्लेषण करण्याची क्षमता असते, ती या कृत्रिम बुद्धिमत्ता वापरणाऱ्या संपादकात असणे शक्य नाही. पण इंटरनेटवरील शेकडो बातम्यांची छाननी करणे आणि त्यापैकी निवडक बातम्या आपल्या वार्तापत्रासाठी निवडणे, त्यांचे पुनर्लेखन करणे, या बाबतीत तो अत्यंत माहीर आहे, हे निश्चित. सध्या तो अमेरिका, जग, अर्थ, मनोरंजन आणि क्रीडा अशा पाच विभागांत बातम्यांची वर्गवारी करून वार्तापत्र तयार करतो. छायाचित्रांचीही निवड करून त्यांचा योग्य त्या ठिकाणी वापर करतो.

विशेष म्हणजे हा संपादक बातम्यांचे पुनर्लेखन करण्यासाठी अथवा बातम्यांचा सारांश देण्यासाठी मूळ बातम्यांतील अख्खी वाक्यं जशास तशी उचलत नाही. तो नैसर्गिक भाषा प्रक्रिया तंत्राचा वापर करून मूळ वृत्तात काय लिहिलं गेलंय याची माहिती करून घेतो. एखादी घटना किती वृत्तस्रोतांनी दिली आहे, त्याचा किती तपशील दिला आहे, नुकसान, फायद्याचे आकडे किती आहेत, आदी अनेक निकष लावून तो बातम्या निवडतो.

प्रा. कॅथी मॅकेओन यांच्या नेतृत्वाखाली आणि रेजिना बार्झिले या प्रमुख विकासकाच्या मार्गदर्शनाखाली या संपादकाने जन्म घेतला आहे. त्यांनी याला पत्रकारांचा शत्रू नव्हे तर त्यांना मदत करणारा सहाय्यक म्हटले आहे. इतकेच नव्हे आजच्या माहितीच्या युगात शेकडो, हजारो बातम्यांतून तुम्हाला हव्या त्या आणि हव्या तेवढ्याच बातम्या देणारा सर्वांनाच उपयुक्त ठरेल असा मदतनीस असल्याचा त्यांचा दावा आहे. प्रा.मॅकेऑन यांच्या सुमारे दोन दशकांच्या कष्टाचे हे फळ आहे.

प्रसिद्ध लेखक मायकल क्रिश्टन यांनी प्रचलित माध्यमांची जागा नवीन इन्फोटोपिया घेणार, असे भाकित दहा वर्षांपूर्वी केले होते. म्हणजे प्रत्येकाची आवड आणि गरज लक्षात घेऊन त्यानुसार



वृत्तपत्राचे पान अथवा रात्रीचे बातमीपत्र तयार करणारे कृत्रिम बुद्धिमत्तेने युक्त असे एजंट जगभरातील माहितीभांडारातून आवश्यक त्या गोष्टी डाऊनलोड करतील, असे त्यांनी म्हटले होते. फक्त हे भाकित करताना त्यांनी 'न्यूयॉर्क टाइम्स' या बलाढ्य वृत्तपत्रालाच मिडियासोर्स असे डायनासॉर प्रमाणे संबोधून या नवीन तंत्रामुळे दहा वर्षात हे वृत्तपत्रच नष्ट होईल असे म्हणून संकट ओढवून घेतले होते. मात्र हा 'व्हर्चुअल एडिटर' म्हणजे इन्फोटोपियाचे हे एक रूप आहे, यात शंका नाही.

## कुसुमाग्रज स्मारक उभारणीसाठी योगदान देण्याचे आवाहन

मानवतेच्या मूल्यांची जपणूक करणे या मुख्य हेतून कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांचे स्मारक उभारण्याचा निर्णय घेण्यात आला असून, या स्मारकासाठी सर्वसामान्य नागरिकांनी व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी योगदान द्यावे, असे आवाहन कुसुमाग्रज स्मारक समितीचे अध्यक्ष हेमंत टकले यांनी केले आहे.

कुसुमाग्रज यांच्या स्मारकासाठी राज्यशासन व नाशिक महानगरपालिकेने एक कोटी रुपये निधी देण्याचे मान्य केले आहे. उभारणीकरिता साडेतीन कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. ही रक्कम उभारण्याची जबाबदारी प्रतिष्ठानने स्वीकारली आहे. कुसुमाग्रज स्मारकाची निर्मिती लवकरात लवकर करून कविश्रेष्ठांच्या जन्मदिनी म्हणजेच २७ फेब्रुवारी रोजी ते पूर्ण व्हावे, अशी योजना आहे.

बैठकीस उपस्थित असलेल्यांपैकी काही जणांनी तत्काळ योगदानाच्या स्वरूपात निधी समितीच्या उपाध्यक्षांकडे सुपूर्द केला. माजी मंत्री आ.डॉ.दौलतराव आहेर यांनी महाराष्ट्रातील सर्व आमदारांच्या आमदार निधीतून स्मारकासाठी निधी गोळा करता येईल, असे यावेळी सुचविले. आपल्यावर या संदर्भात टाकलेली जबाबदारी आपण स्वीकारू, असे आश्वासनही त्यांनी दिले. निधी गोळा करण्यासाठी महाराष्ट्राबरोबरच देशातील मराठी भाषक व लेखक, साहित्यिक, साहित्य संस्था, साहित्य परिषद यांची एक संयुक्त बैठक लवकरच बोलवण्यात येणार असल्याचे टकले यांनी सांगितले.

## साहित्य संगमचे यश

साहित्यिक अभिरुची वाढीस लावण्याच्या हेतूने गेले एक तप सलग १४३ मासिक कार्यक्रम सादर करणारी साहित्य संगम ही गोव्यातील संस्था आहे.

स्वरचित कथा, कविता, ललितलेख, एकांकिका, नाटक आदी साहित्याचे वाचन आणि खुली चर्चा, नामवंतांच्या कथा कवितांचे वाचन व खुली चर्चा, स्वत: वाचलेल्या पुस्तकावर अभिप्रायार्थ बोलणे, टिपण वाचणे, प्रसिद्ध नाटकांवर चर्चा, परिसंवाद, व्याख्याने, नामवंत साहित्यिक व कलाकार यांच्याशी गप्पागोष्टी, साहित्यिक सहल, पुस्तक प्रकाशन अशा विविधरंगी कार्यक्रमांचे आयोजन या संस्थेच्या हरहुन्नरी साहित्यप्रेमी कार्यकर्त्यांतर्फे चालू असते. गेल्या बारा वर्षात शेकडो रसिकांना एकत्र आणून व्यासपीठ उपलब्ध करून दिले.

नवोदित लेखकांबरोबरच वाचक व साहित्यप्रेमी सर्वसामान्य रसिकांनाही मोठी व्यासपीठे उपलब्ध होत नसतात. अशा लोकांना त्यांच्या उमेदीच्या काळात व्यासपीठ उपलब्ध करून देऊन, त्यांच्या साहित्यावर चर्चा घडवून आणून, गुणदोषांची चर्चा करीत त्यांना प्रोत्साहन देऊन त्यांचे लेखन विकसित करण्याचे प्रयत्न या संस्थेने केलेच. याचबरोबर चांगले साहित्य वाचण्याची आणि जे वाचले त्यावर बोलण्याची सवय सामान्यांना लावली. साहित्यिक-वाचक-रसिक यांच्या घरी

भेटवजा कार्यक्रम आयोजित करून पेडणे तालुक्यातील साहित्यिक, वाचक व रसिकांमध्ये परस्पर वैयक्तिक संबंध वाढीस लावले, कौटुंबिक संबंध जोडले, अशी माहिती संस्थापक आणि माजी अध्यक्ष गजानन मांद्रेकर यांनी दिली.

दर महिन्याला एक कार्यक्रम करायचा असे ठरवून सन १९९०च्या मे महिन्यात साहित्य संगमची स्थापना झाली.

तब्बल बारा वर्षे खंड येऊ न देता सलग १४३ कार्यक्रम झाले आहेत. तपपूर्तीचा जून महिन्यात होणारा कार्यक्रम संस्थेचा १४४वा कार्यक्रम असेल. विद्यालयाच्या वर्गात मासिक कार्यक्रम घेणाऱ्या या संस्थेने पुढे १९९५ पासून साहित्यिक, वाचक आणि रसिक यांच्या घरी भेटवजा कार्यक्रम सुरू केले. पेडणे तालुक्यातील गावागावांत हे कार्यक्रम होत राहिल्याने एका अर्थाने ही साहित्यिक चळवळच ठरली आहे.

## हॅरी पॉटर चित्रपटाच्या चित्रफितींचा विक्रमी खप

पुस्तकानंतर आता चित्रपटाच्या माध्यमातूनही मुलांना खिळवून ठेवणाऱ्या हॅरी पॉटरच्या नावावर आणखी एका विक्रमाची नोंद झाली. 'हॅरी पॉटर अँड द फिलॉसॉअर्स स्टोन' या चित्रपटाच्या ध्वनिचित्रफिती बाजारात दाखल झाल्यानंतर पहिल्याच दिवशी ब्रिटनमध्ये तब्बल १२ लाख ५० हजार प्रती खपल्या आहेत. या विक्रीने टायटॅनिकचा १९९७सालचा ११ लाख प्रतींचा विक्रम मोडला आहे.

या चित्रफितींना मोठ्या प्रमाणात मागणी असेल, असा अंदाज होता. पण पहिली प्रत बाजारात दाखल झाल्यानंतर त्याची मागणी करणाऱ्या गिऱ्हाईकांचा प्रतिसाद आश्चर्यकारक होता, असे वॉर्नर होम व्हिडिओचे व्यवस्थापकीय संचालक नील मॅकवॅन यांनी सांगितले.

या चित्रफिती उपलब्ध असलेल्या सर्व दुकानांवर तोबा गर्दी होती. काही दुकाने तर खास याच विक्रीसाठी मध्यरात्रीपर्यंत खुली ठेवण्यात आली होती. ही ध्वनिचित्रफीत नंतर अमेरिकेत प्रकाशित होणार आहे. ब्रिटनमधील मागणी लक्षात घेता अमेरिकेतही त्याला असाच प्रतिसाद मिळेल, हे स्पष्टच आहे.

'हॅरी पॉटर अँड द ऑर्डर ऑफ फीनिक्स' हे नवे पुस्तकही लौकरच बाजारात दाखल होत आहे. त्या पुस्तकाच्या विक्रीलाही या उदंड प्रतिसादाचा फायदा मिळेल, असा कयास आहे.

अर्थात, या पुस्तकांच्या लेखिका जे.के. रॉलिंग यांनी मात्र इतक्यात हे पुस्तक पूर्ण होणार नाही, असे स्पष्टीकरण दिले आहे. परंतु ब्रिटन आणि अमेरिकेतील प्रसिद्धी तज्ज्ञांच्या मते हॅरी पॉटरवरील चित्रपटाच्या यशाचा आणि त्याच्या ध्वनिचित्रफितींच्या विक्रमी विक्रीचा या पुस्तकांना आणखी फायदा होणार आहे.

हॅरी पॉटरने जादुटोण्याच्या शाळेत घालवलेल्या सात वर्षांमधील प्रत्येक वर्षाबद्दल एक अशी सात पुस्तके लिहिण्याचे आश्वासन श्रीमती रॉलिंग यांनी पॉटरप्रेमींना दिले आहे. आतापर्यंत चार पुस्तकांचा टप्पा पूर्ण झाला आहे. संपूर्ण मालिका बाजारात येण्याआधी हा चित्रपट प्रदर्शित झाल्याने या पॉटरप्रेमी वाचकांच्या संख्येत वाढ होईल, याची प्रसिद्धी तज्ज्ञांना खात्री आहे.

## ग्रंथप्रकाशनाच्या निमित्ताने हैदराबाद मुक्तिसंग्रामाला उजाळा

हैदराबाद मुक्तिलढ्यात समर्पित भावनेने सहभागी झालेल्या स्वातंत्र्यसैनिकांच्या डोळ्यांत उपराष्ट्रपती कृष्णकांत यांच्या गौरवोद्गाराने अश्रू तरळले. या लढ्याची दखल घेतल्याशिवाय भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाचा इतिहास पूर्ण होऊ शकत नसल्याने या लढव्याबद्दल स्वतंत्र भारतातील सर्वांनी



कायम कृतज्ञ राहिले पाहिजे, असे कृष्णकांत यांनी म्हटले.

काही स्वातंत्र्यसैनिक तेथील मोजक्या तरुण कार्यकर्त्यांचा आधार घेत; तर काही काठी टेकत रवींद्र भारतीच्या सभागृहात रविवारी आवर्जून आले होते. निमित्त होते 'द सागा ऑफ हैदराबाद लिबरेशन स्ट्रगल इन इंडियाज फ्रीडम मूव्हमेंट'या ग्रंथ प्रकाशनाचे. हा मुक्तिसंग्राम कसा लढवला गेला, यावर स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रेरणेने दहा वर्षे संशोधन करून त्याचा साद्यंत इतिहास या एक हजार पानी ग्रंथाच्या रूपाने व्ही.एच. देसाई आणि सुदर्शन या लेखकांनी साकार केला. या लढ्यातील ते स्वातंत्र्यसेनानी असल्याने या विषयावरचा अधिक विश्वासार्ह ग्रंथ म्हणून त्याकडे बोट दाखवता येईल. ते स्वामी दयानंद तीर्थ यांचे अनुयायी आहेत. स्वामी रामानंद तीर्थ ट्रस्टने प्रकाशित केलेल्या या ग्रंथाचा उपयोग अभ्यासकांना व संशोधकांना अधिक होणार आहे. नव्या पिढीला या लढ्याची ही कहाणी प्रेरणादायी वाटेल, अशी अपेक्षा सर्व वक्त्यांनी बोलून दाखविली ती प्रातिनिधिक होती.

पूर्वीच्या हैदराबाद संस्थानात गुलबर्गा, बिदर, मराठवाडा व तेलंगणाचा भाग येत होता. या लढ्याच्या यशस्वी सांगतेनंतर मराठवाडा, महाराष्ट्राचा; तर गुलबर्गा आदी प्रदेश कर्नाटकाचा भाग झाला. त्यामुळे या प्रदेशाशी संबंधित म्हणून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एस.एम.कृष्णा यांना आवर्जून निमंत्रित करण्यात आले होते. यजमान या नात्याने आंध्र प्रदेशाचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू उपस्थित राहिले.

तीन राज्यांचे मुख्यमंत्री, स्वामी रामानंद तीर्थ ट्रस्टचे अध्यक्ष माजी पंतप्रधान पी.व्ही. नरसिंह राव आणि उपराष्ट्रपती कृष्णकांत याच्या उपस्थितीमुळे या कार्यक्रमाविषयी हैदराबादमध्ये औत्सुक्य होते. पण उपस्थितीत प्रामुख्याने ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक व त्यांचे नातेवाईक यांचा समावेश होता. या पुस्तकात १८५१पासून १९४८ पर्यंतचा सर्व संबंधित इतिहास असून, त्यात भाग घेणाऱ्यांचीही तपशीलवार नोंद आहे.

तात्या टोपे, चंद्रशेखर आझाद इत्यादींचा स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाचा उल्लेख करावयास पी.व्ही.नरसिंह राव विसरले नाहीत.

'निजामाच्या राजवटीतून हैदराबाद संस्थान मुक्त झाल्यावर मराठवाड्याने विनाअट महाराष्ट्रात जाण्याची तयारी दाखवली व हा प्रदेश आज महाराष्ट्राच्या मातीशी राजकीय, सामाजिक व भावनिकदृष्ट्या एकरूप झाला आहे.' असे विलासराव देशमुख यांनी सांगितले.

गुलबर्गा विद्यापीठातील रामानंद तीर्थ यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ अध्यासन निर्माण करण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री एस.एम.कृष्णा यांनी केली.

## सर्वांत जुन्या वाचनालयाचा शतकोत्तर हीरक महोत्सव

महाराष्ट्रातील सर्वांत जुने सार्वजनिक वाचनालय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नगरच्या 'अहमदनगर जिल्हा वाचनालया'चा शतकोत्तर हीरक महोत्सव ता.२२ रोजी समारंभपूर्वक साजरा झाला. त्या निमित्ताने ता.२७ ते ३१ मे दरम्यान दिगंबर मारुती मुळे स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन लोकमान्य टिळक सभागृहात करण्यात आले.

इंग्रजी अंमलात एक इंग्रज अधिकारी कॅप्टन पी.टी.फेंच यांनी १८३८ मध्ये नगरला 'नेटिव्ह जनरल लायब्ररी'ची स्थापना करून ग्रंथालय चळवळीचा पाया घातला. त्यानंतरच्या १६४वर्षातील संस्थेतील घडामोडींचा आढावा 'अजिवा'या विशेषांकात घेण्यात आला. कोलकात्याच्या राजा राममोहन रॉय फाउंडेशनच्या सहकार्याने संस्थेत वर्षभर निबंध, वादविवाद अशा विविध स्पर्धा

घेण्यात आल्या.

संस्थेत सध्या 'बाल', 'मुक्तद्वार', 'महिला', 'पुस्तक', 'मासिके' व 'संदर्भ' असे विविध विभाग कार्यरत असून, सभासदसंख्या २३०० आहे. रोज १६०० वाचक वाचनालयाचा लाभ घेतात. मुक्तद्वार विभागात सर्व प्रकारची वृत्तपत्रे, मासिके, विनामूल्य वाचायला मिळतात. कर्मचाऱ्यांची संख्या १० असून, संजय लिहिणे हे ग्रंथपाल आहेत.

गेली दोन वर्षे राज्य शासनाकडून मिळालेल्या साधनसामग्री अनुदानातून आधुनिकीकरण व संगणकीकरण चालले आहे. संस्थेला ग्रंथालय संचालनालयाकडून दर वर्षी दोन लाख चाळीस हजार रुपयांचे अनुदान मिळते. राजा राममोहन रॉय ग्रंथालयाचेही अनुदान मिळते. वाचनालयात सध्या मराठी, इंग्रजी व हिंदी भाषेतील नव्या जुन्या ६५ हजार ग्रंथांचा संग्रह आहे. विषय व वाङ्मयप्रकारांची विविधता त्यात आहे. संस्था साखळी योजनेद्वारे लिज्ह्यातील १६ ग्रामपंचायत वाचनालयांना ५० ते १०० पुस्तके वापरासाठी देते.

## दे.द.वाडेकर जन्मशताब्दीची सांगता

तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक व मराठी तत्त्वज्ञान कोशाचे संपादक दे.द.वाडेकर यांच्या जन्मशताब्दीचा सांगता समारंभ २५ मे रोजी फर्ग्युसन महाविद्यालयातील ॲम्फी थिएटरमध्ये साजरा झाला.

हैदराबाद येथील इंग्लिश व परकीय भाषा अध्यापन केंद्रीय संस्थान या अभिमत विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. प्रमोद तलगेरी या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. टाइम्स ऑफ इंडियाचे मुख्य कार्यकारी संपादक दिलीप पाडगावकर, डॉ.अशोक केळकर आदी या वेळी उपस्थित होते. पूना फिलॉसॉफी युनियन, तत्त्वज्ञान विभाग, पुणे विद्यापीठ आणि विविध संस्था यांनी या निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. यावेळी 'परामर्ष' व 'इंडियन फिलॉसॉफिकल क्वार्टर्ली' या नियतकालिकांच्या विशेषांकांचे प्रकाशन करण्यात आले.

पूना फिलॉसॉफी युनियन, फर्ग्युसन महाविद्यालय, गुरुवर्य सोनोपंत दांडेकर अध्यासन, तत्त्वज्ञान विभाग, पुणे विद्यापीठ, गीता धर्म मंडळ, महाराष्ट्र साहित्य परिषद, प्रा.बारलिंगे प्रतिष्ठान आदींचा जन्मशताब्दी समितीत समावेश आहे.

## अक्षरसंवेदन : घरपोच साहित्यसेवा

आज सर्वत्र प्रसारमाध्यमांच्या आक्रमणात 'वाचन' कमी होत आहे. घरोघरी आबालवृद्ध संगणकासमोर किंवा टी. व्ही समोर बसलेले दिसून येतात. त्यामुळे वाचनसंस्कृती नष्ट होत आहे. पर्यायाने स्वत:हून विचार करण्याची प्रक्रियाही बंद होत आहे. आजही वाचनाला पर्याय नाही. वाचनामुळे विवेकशीलता वाढते. संवेदनशीलता निर्माण होते. आजच्या या गतिमान, धकाधकीच्या आयुष्यात माणसातील संवेदना, जागृत रहावी यासाठी वाचनाची, पर्यायाने अक्षरांची गरज आहे. म्हणूनच 'अक्षरसंवेदन' हे नाव धारण करून 'वाचकाला केंद्रबिंदू' मानून १५ एप्रिल २००१ रोजी बदलापूरच्या प्रकाश देशपांडे यांनी घरपोच वाचनालयाची सुरुवात केली. देशपांडे यांच्या मते 'अक्षरसंवेदन. ही एक वाचनचळवळ आहे.

देशपांडे यांनी कल्याण येथील अभिनव विद्यालय, नूतन विद्यालय हाजीमलंग रोडवरची वारली शाळा यात काम केले. १९९९ मध्ये स्वेच्छानिवृत्तीनंतर सामाजिक कार्य करण्याचा संकल्प



त्यांनी केला.

आजच्या या धावपळीच्या आयुष्यात मनात असूनही वाचनालयात जाऊन पुस्तक बदलायला जमेलच असं नाही. अशावेळी खुद्द पुस्तकांनीच आपल्या घराचं दार ठोठावलं तर? ह्या संकल्पनेने घरपोच वाचनालयाची सुरुवात झाली. आजकाल वाचनाऐवजी टी. व्ही.चं किंवा संगणकाचं बटण दाबलं जातं. परंतु जर एखादं पुस्तक काही दिवस घरात असेल तर आपण ते निदान चाळून बघू आणि वाचनाची आवड हळूहळू वाढेल. हाही त्यामगचा हेतू.

आज या वाचनालयाचे शंभर सभासद आहेत. 'अक्षरसंवेदन' ही एक वाचन चळवळ आहे. हा व्यवसाय नाही. हळूहळू लोकांना या कल्पनेचं आर्कषण वाटत आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून देशपांडे यांना प्रोत्साहनपर पत्रं येत आहेत. प्रोत्साहनपर अनुभवांमुळे तसेच पत्नीच्या आणि मुलाच्या पाठिंब्यामुळे घरपोच वाचनालयाचा प्रयोग रंगत आहे.

कथा, कादंबरी, चरित्रे, व्यक्तिचरित्रे, आत्मचरित्रे, बालवाङ्मय, कुमार वाङ्मय, क्रीडा, संदर्भग्रंथ, काव्य, युद्धविषयक, ललित, विज्ञानविषयक, प्रवासवर्णन, विनोद, धार्मिक, आध्यात्मिक, राजकीय व्यक्तिमत्त्व विकास, संगणकविषयक, भविष्यविषयक आदी विषयांवरील सुमारे दीड हजार पुस्तकं वाचनालयात आहेत. या सर्व पुस्तकांची मांडणी आणि विभागणी सुबकपणे केलेली आहे. बाहेर फळ्यावर उत्कृष्ट कविता सुवाच्य अक्षरात लिहिलेल्या असतात. वाचनालयाच्या बोर्डावर नवीन सुविचार असतात. उदा. Read any book as you like but handle it, as your heart.


वाचनालय सुरु करण्यासाठी प्रवेश शुल्क आहे २० रुपये अनामत ३०० रुपये. मासिक वर्गणी ८०रु. एकावेळी १ पुस्तक आणि १ मासिक किंवा २ पुस्तक किंवा २ मासिकं मिळतात. प्रत्येक वाचकाला पुस्तकाची, मासिकांची यादी दिली जाते. त्या यादीतून पुस्तक, मासिक निवडताना वाचकाला पाच पर्यायांची सोय असते. सध्या तरी हे वाचनालय बदलापूर परिसरापुरतेच मर्यादित आहे. वेगवेगळ्या विभागासाठी वेगवेगळे वार ठरलेले आहेत. त्यानुसार वाचनालयाचे कार्यकर्ते घरोघरी जातात.

मान्यवर साहित्यिकांच्या हस्ते दरवर्षी 'उत्कृष्ट वाचक पुरस्कार' दिला जाणार आहे. ज्या वाचकाने वर्षभर कसदार साहित्याचे वाचन केले असेल तसेच वर्षभर कार्यक्रमात भाग घेतला असेल तर त्या वाचकास हा पुरस्कार दिला जातो. या पुरस्काराचं हे पहिलंच वर्ष आहे.

भविष्यात 'मासिक पत्रिका' काढण्याचा त्यांचा विचार आहे. त्यात पुस्तकांचे परिचय दिले जातील. वाचकसुद्धा या पत्रिकेत पुस्तक परिक्षणे देऊ शकतात. मासिक पत्रिका म्हणजे वाचक, वाचनालय आणि पुस्तकं यांच्यातील मुक्त संवाद असेल.

आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे सभासदांच्या लहान मुलांसाठी वाचनालयाची सेवा मोफत पुरवली जाते. अप्रतिम इंग्रजी पुस्तकेसुद्धा आहेत. वाचकाला जे वाचावेसे वाटते ते उपलब्ध करून देण्याचा आणि वाचनाची भूक भागवण्याचा प्रयत्न केला जातो. स्वत: देशपांडे वाचकाला कोणती पुस्तकं हवी आहेत याची विचारपूस करतात.

या वाचनालयाच्या एक सभासद डॉ. जयश्री अभ्यंकर 'कुसुमाग्रज प्रतिष्ठान'च्या विद्यार्थिनी आहेत. त्यांना हवी ती पुस्तके देशपांडे आणून देतात. डॉ. जयश्री अभ्यंकर यांच्या मते देशपांडे वाचकाला नाराज करत नाहीत. वाचकांना केव्हाही आणि कितीही वेळ द्यायला ते तयार असतात.




**प्रा. लक्ष्मणराव ढोबळे यांना डॉ. आंबेडकर राष्ट्रीय पुरस्कार**

नवी दिल्ली येथील भारतीय दलित साहित्य अकादमीतर्फे दिला जाणारा यंदाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय पुरस्कार अन्न व नागरी पुरवठामंत्री प्रा. लक्ष्मणराव ढोबळे यांना जाहीर झाला आहे.

विविध क्षेत्रांत दलितोद्धाराचे कार्य करणाऱ्या व्यक्तींना या पुरस्काराने गौरविले जाते. सामाजिक व साहित्यिक कार्यातून उपेक्षित दलित समाजाच्या उत्कर्षासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो.

प्रा. ढोबळे यांच्याबरोबरच हिमाचल प्रदेशचे राज्यपाल सूरज भान, राष्ट्रीय मानवी हक्क समितीचे अध्यक्ष न्या.जे.एस.वर्मा आदींना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. या पुरस्कारास राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जा असून, आंतरराष्ट्रीय पुरस्कार 'बुद्धा एज्युकेशन फाउंडेशन, तैवान' या संस्थेला जाहीर झाला आहे.

**डॉ. पु.ग. सहस्रबुद्धे निबंध स्पर्धेत गीतांजली ससे प्रथम**

पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागातर्फे घेण्यात आलेल्या पु. ग. सहस्रबुद्धे स्मृती निबंध स्पर्धेत नगर येथील राधाबाई काळे महिला महाविद्यालयाची द्वितीय वर्ष कला शाखेची विद्यार्थिनी गीतांजली मधुकर ससे हिने एक हजार रुपयांचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले.

पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयातील पदवी आणि पदव्युत्तर वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा घेण्यात आली होती. स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. अविनाश आवलगावकर, डॉ.मनोहर जाधव, प्रा. सोमनाथ दडस यांनी काम पाहिले.

निबंधस्पर्धेचा निकाल : जागृती ठाकरे, द्वितीय (के.टी.एच.एम. महाविद्यालय, नाशिक), मेघाली रणदिवे (जर्मन विभाग, पुणे विद्यापीठ)

उत्तेजनार्थ बक्षिसे : नाना कवडे (मराठी विभाग, पुणे विद्यापीठ), समिंदर मधुकर घोक्षे (टिकाराम जगन्नाथ महाविद्यालय, खडकी), संतोष खडके (कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आळे), संतोष धोत्रे ( हिंदी विभाग, पुणे विद्यापीठ)

**वि.आ.बुवा, डॉ.ढेरे यांना साहित्य परिषदेचे पुरस्कार**

प्रसिद्ध विनोदकार वि.आ. बुवा यांना प्रदीर्घ व गुणवत्तापूर्ण लेखनकार्याबद्दल 'महाराष्ट्र साहित्य परिषद पारितोषिक' जाहीर झाले, तर ज्येष्ठ संशोधक डॉ. रा.चि.ढेरे यांना 'मृत्युंजय'पुरस्कार



देण्यात आला.

मध्यप्रदेश मराठी साहित्य संघाचे डॉ. चंद्रकांत पांढरीपांडे यांना 'डॉ. भीमराव कुलकर्णी पुरस्कार' देण्यात आला. सार्वजनिक संस्थेत निरलसपणे कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यास हा पुरस्कार देण्यात येतो. या कार्यक्रमाला उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष उल्हास पवार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

वार्षिक ग्रंथ पारितोषिक वितरण ज्येष्ठ कवी मंगेश पाडगावकर यांच्या हस्ते २६ मे रोजी झाले. ज्येष्ठ साहित्यिक शिवाजी सावंत हे अध्यक्ष होते. यशोदा पाडगावकर प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

ज्येष्ठ कवी सुरेश भट, श्री. पाडगावकर, प्रा. श्रीनिवास दीक्षित, डॉ.अशाक कामत, शांता निसळ, डॉ. दत्ता भगत, डॉ.वसंत स.जोशी, डॉ. सदानंद मोरे, निरंजन घाटे यांना विशेष ग्रंथकार पुरस्कार देण्यात आले.

अन्य पारितोषिकांसाठी निवड झालेल्या ग्रंथांची व त्यांच्या लेखकांची नावे पुढीलप्रमाणे : 'चौखूर'- विलासदत्त राऊत, 'दरिद्रीनारायण' - व.न. इंगळे, 'रिवणावायली मुंगी' - राजन गवस, 'वि.स. खांडेकर- सचित्र चरित्रपट' - जया दडकर, 'साहित्याचे परीघ' - निशिकांत ठकार, 'महाराष्ट्र-कर्नाटक सांस्कृतिक अनुबंध' - संपादक : अ.रा. तोरो, 'ज्वलज्वलन तेजस संभाजी राजा' डॉ. सदाशिव शिवदे, 'युगायुगातील अगस्त्य परंपरा' - डॉ. मधुसूदन बोपर्डीकर, 'गुरूची गुरुमाऊली मुक्ताई' - डॉ.विजया संगवई, 'तुका म्हणे- तुकाराम अवतरण कोश' - डॉ. कृष्णा इंगोले, 'सारे छान छोटे' - वसुंधरा हुईलगोळ, 'लोककथा'- संभाजी खराट, 'रंगरूप दर्शन' मधुकर तोरडमल, 'मुस्लिम मनाचा शोध' - शेषराव मोरे, 'विचारमंथन' डॉ. स.रा. गाडगीळ, 'आहार आणि आरोग्य' - डॉ. ह.वि.सरदेसाई, 'ख्रिस्ती लोकहितवादी' - सुनील आढाव, 'नोकरदार स्त्री आणि लिंगवाद' डॉ. अलका वाडकर, 'समाज शास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर' - डॉ. प्रदीप आगलावे, 'अळिंबी लागवड : कृषिपूरक उद्योग' - डॉ. दिनकर सावंत, संजय कोळसे. प्रा चिंतामणी अवचट, 'संस्कृतीच्या पाऊलखुणा'- डॉ. द.ता. भोसले.

**योग्य मार्गाने शिक्षण न मिळणे हे जगातील सर्व तंट्यांचे कारण**

श्री गुलाबराव महाराज वाङ्मय मंदिर समितीतर्फे या वर्षीचा पुरस्कार (पाच हजार रुपये) संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांना डॉ. कोळस्कर यांच्या हस्ते देण्यात आला. 'केसरी'चे मुख्य संपादक डॉ. दीपक टिळक कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. गुलाबराव महाराजांच्या दोन पुस्तकांचे यावेळी प्रकाशन करण्यात आले, तसेच समीर पांडे व सहकाऱ्यांनी विकसित केलेल्या गुलाबराव महाराजांवरील संकेतस्थळाचे उद्‌घाटनही झाले.

''ज्या प्रकारचे शिक्षण द्यायला पाहिजे, ते देत नाही, हे भारतासह जगातील आजच्या सर्व तंट्यांचे कारण आहे,''असे प्रतिपादन पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अशोक कोळस्कर यांनी केले.

डॉ. भटकर म्हणाले, ''सर्व धर्मांचा, नीतींचा समन्वय घडवून आणण्याचे काम गुलाबराव महाराजांनी विसाव्या शतकातच केले आहे. सर्व धर्मांचा समन्वय होईल का, हाच आजच्या विचारवंतांपुढे विचार असून, माझ्या मते तो शक्य आहे. समन्वयाचे तत्त्वज्ञान सांगणारे गुलाबराव महाराजांचे वाङ्मय आधुनिक वैज्ञानिकांनी वाचण्याची गरज आहे, कारण त्यातूनच समन्वयाची

नवीन दिशा जगापुढे येऊ शकेल.''

आळंदी येथे गुलाबराव महाराजांचे वाङ्मय मंदिर होण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन देताना, पुरस्काराच्या रकमेत तेवढीच रक्कम टाकून डॉ. भटकर यांनी ही रक्कम या वाङ्मय मंदिरासाठी दिली. हा पुरस्कार खरे तर गुलाबराव महाराजांच्या वाङ्मयावर पीएचडी करणारे भैय्यासाहेब गटाटे यांना मिळायला हवा होता, असे प्रांजळपणे सांगत, त्यांच्या वतीने तो स्वीकारीत असल्याचे डॉ.भटकर म्हणाले.

## मालोजीराजे पुरस्कार तिघांना जाहीर

फलटण येथील मालोजीराजे सहकारी बँकेच्या वतीने अनंतराव पाटील, प्राचार्य शिवाजीराव भोसले व बॅ. पी.जी. पाटील या तिघांना पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत.

बांधकाममंत्री व काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष असताना मालोजीराव नाईक-निंबाळकर यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांच्या नावाने हा पुरस्कार देण्यात येतो.

१९९९ या वर्षासाठी पुण्याच्या विशाल सह्याद्रीचे माजी संपादक व माजी खासदार अनंतराव पाटील यांची निवड झाली आहे.


सन २००० वर्षाच्या पुरस्कारासाठी मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू बॅ.पी.जी. पाटील यांची निवड झाली आहे. शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या व्यक्तीला हा पुरस्कार दिला जातो. यशवंतराव मोहिते, रा.ना. उर्फ बन्याबापू गोडबोले, विधानसभेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब भारदे यांना हा पुरस्कार देण्यात आला होता. १४ मे रोजी इंदिरा गांधी सांस्कृतिक केंद्रामध्ये राज्यमंत्री रामराज नाईक-निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली माळशिरसचे माजी आमदार चांगोजीराजे उर्फ बाबूराव देशमुख यांच्या हस्ते हे पुरस्कार देण्यात आले. नगराध्यक्ष रघुनाथराजे नाईक-निंबाळकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ११ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

## 'बालकाण्ड'चा समाजशास्त्रीय अंगाने विचार होणे आवश्यक

'बालकाण्ड' या साहित्यकृतीचा केवळ समीक्षेच्या दृष्टिकोनातूनच नव्हे तर समाजशास्त्रीय अंगानेही विचार होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांनी केले.

मॅजेस्टिक प्रकाशनतर्फे दरवर्षी देण्यात येणारे 'केशवराव कोठावळे पारितोषिक' यंदा ह.मो.मराठे यांच्या 'बालकाण्ड'या पुस्तकास देण्यात आले. १५ हजार १५१ रुपये व मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या प्रा.वीणा देव म्हणाल्या की, पन्नास वर्षांपूर्वीच्या समाजव्यवस्थेविषयी कुठलाही राग प्रकट न करता, प्रत्ययकारी रीतीने हे आत्मकथन वाचकांसमोर येते. हेच या पुस्तकाचे यश आहे.






# वीरप्पन

पुस्तक परिचय

**मूळ लेखक : सुनाद रघुराम**
**अनुवाद : डॉ. प्रमोद जोगळेकर**

## वीरप्पन : जननायक की दरोडेखोर?

कुसे मुनिस्वामी वीरप्पन हे नाव भारतातील प्रत्येक लहानथोराला आता ठाऊक झालेले आहे. भारताततल्या या मोस्ट वॉन्टेड चंदनतस्कराला पकडून देणाऱ्यास ४० लाखांचे इनाम जाहीर झालेले आहे, आणि तरीही गेली अनेक वर्षे पोलिसांना गुंगारा देण्यात तो यशस्वी ठरलेला आहे.

कर्नाटक आणि तामिळनाडू या राज्यांमध्ये त्याच्या नावावर १३४ गुन्ह्यांची नोंद आहे. ११९खून त्याने केलेले आहेत. (त्यात ३२ पोलिस अधिकारी आणि १०वनअधिकारीही आहेत.) शंभरावर हत्तींना त्याने ठार मारलेले आहे आणि निलगिरी पर्वताच्या परिसरातील हजारो चंदनाची झाडे बेकायदेशीरपण तोडून त्याने कोट्यवधी रुपयांची कमाई केलेली आहे. दोन वर्षांपूर्वी अभिनेता राजकुमारचे अपहरण करून वीरप्पनने आपल्या सामर्थ्याची चुणूक दाखविली. या वीरप्पनची रोमहर्षक जीवनकहाणी सुनाद रघुराम यांनी कानडीत प्रसिद्ध केली; तिचा मराठी अनुवाद डॉ. प्रमोद जोगळेकर यांनी केला असून, मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे तो नुकताच बाजारात आला आहे.

वीरप्पनचे वास्तव्य पश्चिम घाटातील कर्नाटकातील म्हैसूर- चामराजनगर आणि तामिळनाडूतील धर्मपुरी -इरोड-सालेम-निलगिरी यांच्या मधील १८ हजार चौ.किलोमीटरच्या विस्तीर्ण जंगलात असते. मलाई महदेश्वर डोंगराच्या पायथ्याशी गोपीनाथम हे गाव आहे, तेथे गोपालक पडियाच्ची गौंडेर समाजाची प्रामुख्याने वस्ती आहे. कुसे मुन्निस्वामी व पुनितयम्मा या दांपत्याला १८ जानेवारी १९५२ रोजी एक पुत्र झाला. त्याचे नाव वीरप्पन.

आपल्या दोन भावंडांबरोबर जंगलातले बांबू कापून विकणे, लंगूर माकडांची शिकार करणे, वगैरे कामात वीरप्पन कुमारवयातच तरबेज झाला. नेमबाजीतही त्याने प्रावीण्य मिळवले. सेली गौंडेर या तस्कराने वीरप्पनची हुशारी बघून त्याला हत्तीच्या शिकारीच्या व्यवसायात सहभागी करून घेतले. कमीत कमी धोका पत्करून हत्तीची शिकार करणे, चंदनाची तस्करी करणे, गावातल्या लोकांवर वचक ठेवणे, आपल्या मार्गात आडवे येणाऱ्यांचा बंदोबस्त करणे, वगैरे दहशतवादी प्रकारांनी वीरप्पनचा दबदबा निर्माण झाला.

हस्तिदंताला त्या काळी किलोला हजार-पंधराशे रुपये भाव मिळे तर चंदनाला किलोमागे

## पुस्तकाची खास वैशिष्ट्ये...

-१३४ गुन्हे, ११९ खून करणाऱ्या सद्यःकाळातील 'मोस्ट वॉन्टेड'चंदनतस्कराच्या आयुष्याचा साकल्याने मागोवा घेणारे पहिलेच पुस्तक.

-वीरप्पनच्या बंदोबस्तावर शासनाचा दरवर्षी २१ कोटी रुपयांवर खर्च होतो. तरीही तो पोलिसांच्या हाती सापडत नाही याचे रहस्य काय?

- वीरप्पनच्या पत्नीला न्यायालयाने निर्दोष म्हणून सोडून दिले. तीने काही काळ पानाचा ठेला चालवला.

-वीरप्पनला आता गुन्हेगारी जीवन संपवून साधा माणूस म्हणून जगायचे आहे. परंतु कायदा, शासन त्याच्या आड येते आहे- हे कितपत खरे आहे?

८० रुपये सुटत. सेवी गौंडेरने वयोमानाने या तस्करीतले लक्ष कमी केले आणि वीरप्पनच्या हाती सर्व सूत्रे आली.

याच भागात सेल्वराज उर्फ मप्टी वायन (फावड्यासारखे तोंड असलेला) हा रॉबिनहूडसारखा एक दरोडेखोर इ.स.१९४०-५० दरम्यान कार्यरत होता; आणि श्रीमंतांना लुटून गरीबगरजूंना मदत करणारा कनवाळू अशी त्याची प्रतिमा जनमानसात रुजली होती. या मप्टी वायनवर त्याच्या एका रखेलीने विषप्रयोग करून त्याला ठार मारण्याचे ठरविले. या कामात वीरप्पनच्या बापाने तिला मदत केली असे म्हणतात...

वीरप्पनची चंदनतस्करीतील आणि हस्तिदंत व्यवहारातील अफाट कमाई बघून त्या भागातले बेकार तरुणही या व्यवसायात मोठ्या प्रमाणावर येऊ लागले. चंदनाची झाडे तोडणे हा त्यांचा किफायतशीर कमाईचा राजमार्ग बनला. त्याचबरोबर अशा टोळ्यांनी तोडलेल्या चंदनाचे ट्रक लूटून आयतेच गबर होण्याचाही प्रयत्न काही लुटारू टोळ्यांनी सुरू केला.

वीरप्पनने या सर्वांचा बंदोबंस्त ठेवण्यासाठी, आपण सर्वांनी सलोखा निर्माण करावा असे आवाहन करण्यासाठी ४ जानेवारी, १९८९ रोजी सर्व गावाला मेजवानीचे आमंत्रण दिले. वीरप्पनने सर्वांना म्हटले,'' जंगलात भरपूर माल आहे. आपल्याला काहीच कमी पडणार नाही. मग एकमेकांना त्रास कशासाठी द्यायचा? एकमेकांशी भांडत का राहायचे? आपण सर्वांनी शांततापूर्ण सहकार्य करायला हवे.'' इतरांनाही हे म्हणणे पटले. मद्य पिऊन सर्वांनी हा शांतता प्रस्ताव मंजूर केला... भरपूर खाऊन सारेजण झोपले. तेव्हा वीरप्पनने आपल्या पाच मुख्य प्रतिस्पर्ध्यांना आपण एकमेंकांच्या पाया पडून हा शांतताकरार पक्का करू या असे सुचवले. आणि गावातल्या चौकात त्यांना नेले.

नमस्कारासाठी हे पाचजण वाकले असता त्यांच्यावर गोळ्या झाडून वीरप्पनने त्यांना ठार केले. ''जो माझ्या मार्गात आडवा येईल त्याची अशी गत होईल'' असे ओरडून सर्वांना म्हटले. त्या पाचही मृतदेहांचे कुऱ्हाडीने तुकडे केले. ते बैलगाडीत घालून गावभर फिरवले... वीरप्पनने या



प्रकारे प्रचंड दहशत निर्माण केली.

या घटनेनंतर वीरप्पनचा सर्वांनीच धसका घेतला. पण खरेतर त्या आधीच्या दशकात त्याने आपला हिसका सर्वांना दाखवला होताच. १९८० ते ९० या दरम्यान वीरप्पनच्या चंदनतस्करीच्या टोळीत शंभरावर तरुणांचा समावेश होता. पोलिस आणि वनअधिकारी त्याच्यापुढे हताश होते. त्या भागात ग्रॅनाइटच्या हजारावर खाणी होत्या. आणि या खाणमालकांकडून वीरप्पन खंडणी वसूल करू लागला; तसेच त्यांच्याकडून जिलेटिनच्या कांड्या घेऊन त्यापासून गावठी बॉंबची निर्मिती करू लागला. मुख्यमंत्री बंगारप्पा यांनी या खाणींचे काम थांबवले. त्यामुळे खाणमालक आणि कामगार यांचे प्रचंड नुकसान झाले. मोहनय्या नामक तरुण वनरक्षकाने १९८९च्या ऑगस्टमध्ये वीरप्पनची चंदनाची लॉरी पकडली आणि माल जप्त केला; तेव्हा वीरप्पनने ४ सप्टेंबर १९८९ रोजी पाळत ठेवून त्याच्यावर गोळीबार करून त्याला ठार मारले. आपण या जंगलचे राजे आहोत, येथे आपला अधिकार चालतो, कर्नाटक सरकारचा नाही, अशी दवंडीच त्याने पिटली आणि आधुनिक काळातील एका रक्तरंजित गुन्हेगारी पर्वाचा दणका सुरू झाला.

वीरप्पनच्या एकूण कारकीर्दीचा आलेख सुनाद रघुराम यांनी परिश्रमपूर्वक काढला आहे. १९९० नंतर वीरप्पनने आधुनिक शस्त्रास्त्रे हस्तगत करून आपले सामर्थ्य वाढविले. वीरप्पन कुठेच एकदोन दिवसांपेक्षा जास्त राहात नसे. पाण्याची सोय बघून त्याची टोळी सतत मुक्काम बदलत असे. त्या त्या गावातील प्रमुख व्यापाऱ्याकडून वीरप्पन शिधासामग्री मिळवत असे; गावकऱ्यांपैकी कोणाला तरी ओलीस धरून गावकऱ्यांना आपल्या म्हणण्याप्रमाणे वागण्यास भाग पाडत असे. शिधासामग्रीचे पैसे तो देत असे: ती आणून देणाऱ्यालाही भरपूर बिदागी देत असे. लंगूर आणि सांबर यांची शिकारही करीत असे.

वीरप्पन प्राण्यांच्या आवाजाची नक्कल करण्यात पटाईत आहे. प्रणयासक्त लंगूरच्या आवाजाची नक्कल तो इतकी बेमालूम करी की एकदोन लंगूर लगेच धाव घेत. हत्तींचे आवाजही तो उत्तम काढतो. त्या आवाजामुळे हत्तीही जवळ येत. मग त्यांची शिकार करणे सोपे जाई. पोलिसांना वीरप्पन सहज गुंगारा देई, प्रसंगी गोळ्या घालून त्यांना ठारही मारी. खबऱ्यांचाही बंदोबस्त करी.

सुनाद रघुराम यांनी वीरप्पनला पकडण्यासाठी आखण्यात आलेल्या मोहिमांची माहितीही विस्ताराने दिली आहे. वीरप्पनला जेरबंद करण्यासाठी अनेक विशेष मोहिमा काढण्यात आल्या. खास पोलिस पथके पाठवण्यात आली. नोव्हेंबर १९९०मध्ये डेप्युटी कमांडंट पी. श्रीनिवास यांनी चिकमगळूरचे वनअधिकारी असताना, विशेष कृतिदलामध्ये पूर्णवेळ काम केले. वीरप्पनबद्दल मिळेल ती माहिती गोळा करण्याचा त्यांनी चंग बांधला. खुद्द गोपीनाथम गावात त्यांनी मुक्काम करून तेथील गावकऱ्यांना वैद्यकीय मदत उपलब्ध करून दिली. गावकऱ्यांचा विश्वास संपादन केला. गावकरी त्यांजकडे देवदूत म्हणून बघू लागले. वीरप्पनचे बावीस साथीदार त्यांना शरण आले. त्यांना न्यायालयापुढे उभे केले गेले. त्यांच्या जीविताची जबाबदारी श्रीनिवास यांनी स्वत:वर घेतली होती. परंतु एलटीटीई या श्रीलंकेतील दहशतवादी गटाशी या लोकांचा संबंध असल्याचे दाखवून पोलिसदलाने वनसंरक्षक श्रीनिवास हे आमच्यात नकोत अशी भूमिका घेतली. तरीही त्यांनी वीरप्पनला पकडण्यासाठी मलाई महदेश्वर परिसरातले जंगल पिसून काढण्याचे ठरवले. वीरप्पनचा भाऊ अर्जुन याला जामीन मिळवून दिला.

वीरप्पनची बायको ऑगस्टमध्ये पळून गेली. तिला या पलायनात मदत करण्याच्या आरोपावरून वीरप्पनची बहीण मरिअम्मा हिला पोलिसांनी पकडले... तिने नंतर आत्महत्या केली तेव्हा तिच्या मृत्यूला श्रीनिवास जबाबदार आहे असे समजून वीरप्पनने एक कपटी खेळी केली; आणि श्रीनिवासला भेटायला अर्जुनला त्याने पाठवले. ''माझ्या भावावर मजप्रमाणेच तुमच्यामुळे परिणाम झाला आहे. त्याला शस्त्रे खाली ठेवून, गुन्हेगारी मार्ग सोडायचा आहे. तो फक्त तुम्हाला शरण येईल.'' त्याप्रमाणे भेटीच्या स्थळाकडे श्रीनिवास निघाला. वाटेत पाण्यासाठी थांबला तेव्हा वीरप्पनच्या साथीदारांनी गोळ्या घालून त्याची हत्या केली. (पृष्ठ ५०) श्रीनिवासच्या धडावर पेट्रोल शिंपडून जाळले. त्याचे मुंडके धडावेगळे केले. पडियाच्ची गौंडेर जमातीत मेलेल्याचे शरीर धड राहिले तर त्याचे पिशाच्च होते अशी समजूत आहे. श्रीनिवासचे मुंडके त्याने घरी आणले आणि ते एका दगडावर ठेवून त्याला लाथ मार असे त्याने आपली पत्नी मुथ्थुलक्ष्मी हिला सांगितले. श्रीनिवासच्या मृत्यूने वनविभागाच्या लोकांना हादरा बसला.

१९९२मध्ये वीरप्पनने खाणमालक संपनगीरमय्या याच्या तीस वर्षाच्या राममूर्ती या तरुण पुत्राला पकडले आणि दोन कोटी रुपयांची खंडणी मागितली. हा सौदा पंधरा लाखावर मिटला. एक महिना राममूर्ती वीरप्पनच्या ताब्यात होता.

मुथ्थुराम व नागराज हे दोघे वीरप्पनला पकडून देऊन इनाम जिंकण्याची स्वप्ने घोळवतात. ते पोलिसांशी संपर्क साधतात. वीरप्पनला जाळ्यात पकडण्यासाठी ते 'शकील' या सहकाऱ्याला शस्त्रास्त्रे पुरवणाऱ्या दलालाची व विक्रेत्याची भूमिका करायला लावतात. वीरप्पनचा क्रमांक दोनचा साथीदार गुरुनाथन पोलिसांच्या तावडीत सापडतो. तेव्हा त्याची हत्या होते. दिन्नळ्ळी जंगलात पोलिसांबरोबर झालेल्या चकमकीत तो मारला गेला अशी नोंद पोलिसदप्तरी होते. वीरप्पन या हत्येचा सूड उगवण्यासाठी रामपुरा पोलिस ठाण्यावर हल्ला करण्याची योजना आखतो. ती पार पाडून अनेक पोलिसांना ठार मारून पळ काढतो.

वीरप्पनच्या 'अशा' पराक्रमाचे व हुशारीचे अनेक प्रसंग या चरित्रकहाणीत आलेले आहेत. पोलिसांच्या वाहनावर हल्ला करून रायफली, काडतुसे, पिस्तूल, वायरलेस सेट, वॉकीटॉकीच्या बॅटऱ्या वगैरे माल हस्तगत करण्याचे प्रकार तर वरचेवर घडतात.

१९९३मध्ये वीरप्पनच्या टोळीत १५० लोक होते. त्यात २५ स्त्रिया होत्या. दीडशे हत्यारे; लाखो रुपये- यामुळे वीरप्पनच्या भोवती अजिंक्यपणाचे वलय निर्माण होऊ लागले होते. कर्नाटक व तामिळनाडू या दोहोंच्या सीमेवरील टेकड्यांच्या जंगली भागात वीरप्पनचा मुक्त संचार चाले. विशेष कृतिदलाच्या एका बसच्या वाटेवर स्फोट घडवून आणून २२ लोकांचे वीरप्पनने बळी घेतले. उपमहानिरीक्षक शंकर बिद्री यांना डेप्युटी कमांडंट म्हणून १९९३मध्ये या भागात पाठवण्यात आले. तामिळनाडूचे अतिरिक्त पोलिस महासंचालक वॉल्टर दावारम यांच्याकडे दोन्ही राज्यांच्या संयुक्त मोहिमेचे नेतृत्व देण्यात आले. मोहिमेसाठी २५० जवानांची निवड करण्यात आली. त्यांना महिनाभर प्रशिक्षण देण्यात आले. या जवानांच्या तीन जीपगाड्यांवर वीरप्पन हल्ला चढवतो आणि अनेक जवानांना ठार मारतो.

१९९४मध्ये वीरप्पनची पत्नी मुथ्थुलक्ष्मी पोलिसांच्या तावडीत सापडली. पोलिस तिला डिंबमच्या तळावर नेतात. चौकशी करताना तिच्या कानाला व स्तनाग्राला वायर जोडून शॉक देतात. पोलिसांनी पुढच्या दीड वर्षात वीरप्पनच्या ५६ सहकाऱ्यांना ठार मारले; ९० जणांना अटक केले;



त्यामुळे वीरप्पन हैराण झाला, पण तो खचला मात्र नाही. आपल्या बायकोला पकडण्यास मदत करणाऱ्या पुनजमूर गावच्या मुखिया मुथे गोंडीला वीरप्पनने दम भरला; आणि त्या कुटुंबातील महालिंग, नागराजा, दुडप्पा व भद्रे गौडा यांना गोळ्या घातल्या. त्या कुटुंबातला मुथे गोंडाचा मुलगा दोरायस्वामी हा पळ काढण्यात यशस्वी झाला पण त्याचे सगळे कुटुंब उद्ध्वस्त झाले आणि त्याच्या डोक्यावर परिणाम झाला.

मुथ्थुलक्ष्मीला न्यायालयात उभे केले जाते. न्यायाधीश तिला मुक्त करतात. पोलिस उपअधीक्षक अशोककुमार तिला नोकरी व घर देऊ पाहतो. परंतु वीरप्पनची बायको म्हटल्यावर सर्वजण तिला दूर लोटतात. शेवटी ती आपल्या माहेरी येते. होजिअरीच्या कारखान्यात अकराशे रुपये पगारावर हेल्पर म्हणून काम करते. वसतिगृहात राहते. मुलीला शाळेत घालते. वर्षभराने ती पानसिगारेटचा एक ठेला उभा करते.

वीरप्पन नियती मानतो. ''रामाला चौदा वर्षे वनवास सोसावा लागला. पांडवांना १२ वर्षे वनवास भोगावा लागला. माझ्या नशीबात २५ वर्षांचा वनवास आहे.'' असे तो म्हणतो.

३०जुलै२००० रोजी वीरप्पन गजनूर गावात प्रवेश करून अभिनेता राजकुमार याचे अपहरण करतो. खंडणी व इतर अटी याबद्दल बराच घोळ चालतो. पत्रकार गोपाल हा शिष्टाईसाठी ये-जा करतो. सुप्रीम कोर्टाच्या कडक भूमिकेमुळे कर्नाटक-तामिळनाडू सरकार निष्प्रभ ठरते. शेवटी वीरप्पनच १०८ दिवसांनी राजकुमारला मुक्त करतो. त्याने वीस-तीस कोटी रुपये खंडणी घेतली अशी अफवा आहे.

राजकुमार अपहरण प्रसंगात त्यांन आपल्याला बिनशर्त माफी द्यावी, काही कोटी रुपये द्यावे वगैरे मागण्या केल्या होत्या. खरे तर तो आता वनवासाला कंटाळला आहे; आणि मुख्य प्रवाहात येण्यास उत्सुक आहे. परंतु त्याला आपल्या सुरक्षिततेची चिंता आहे. सरकार तशी हमी देण्यास तयार नाही. सर्वोच्च न्यायालयाने त्याबाबत कडक भूमिका घेण्याचा आदेश सरकारला दिला आहे.

वीरप्पनसारखा एक बंडखोर तस्कर पंधरावीस वर्षे मुक्त राहू शकतो, दरवर्षी त्याच्या बंदोबस्तासाठी सरकारला २१ कोटी रुपयांवर रक्कम खर्च करावी लागते; पत्रकार त्याला भेटून त्याचे निरोप आणतात पण पोलिसांना मात्र तो सापडत नाही, शंभरावर खून करूनही तो दहशतवादी मार्गानेच चालत राहतो; हे सर्व अनाकलनीय आहे.


या पुस्तकातील त्याचे जे काही चित्र समोर येते, ते अनेक जागी आधेअधुरे व अपुरे असले तरी आपल्या विवेकशक्तीला झिणझिण्या आणणारे आहे. वीरप्पनसारख्या क्रूरकर्म्याचा धिक्कार करायचा की प्रचंड शासकीय व पोलीशी बळाशी एकाकी टक्कर घेऊन वीस वर्षे मर्दुमकी गाजवणारा वीरनायक म्हणून त्याचा उदोउदो करायचा असा प्रश्न पडतो.

**किंमत : २२०रु. सवलतीत : १७६रु. सभासदांना :१६५रु. पोस्टेज :२५रु.**


# सभासद व्हा आणि मिळवा २५% सवलत!

**अधिक माहितीसाठी लिहा**

**मेहता पब्लिशिंग हाऊस**,१२१६ सदाशिव पेठ,धनश्री अपार्टमेंटस्, पुणे-३०.
फॅक्स : ०२०-४४७५४६२ **Email - mehpubl@vsnl.com**




# कन्टेजन

**मूळ लेखक : डॉ. रॉबिन कुक**
**अनुवाद : डॉ. प्रमोद जोगळेकर**

## प्लेग, टुलेरेमिया, रिकेटशिया अशा दुर्मिळ संसर्गजन्य साथींचे विषाणू जेव्हा पुन्हा अवतरतात

डॉ. रॉबिन कुक यांच्या वैद्यकीय पार्श्वभूमीवरील क्रोमाझोम-६ सारख्या थरारकथा-कादंबऱ्या बेस्टसेलरच्या यादीत नेहमी अग्रभागी राहिल्या आहेत. वैद्यकशास्त्रात सतत नवेनवे शोध लागत असतात आणि त्यामुळे माणसाचे आयुष्य रोगमुक्त व निरामय होत असते. परंतु त्याचबरोबर या नवनव्या शोधांचा वापर करून आपला जास्तीत जास्त फायदा कसा होईल याकडे काही बुद्धिमान गुन्हेगार समाजकंटकांचे लक्ष केंद्रित झालेले असते आणि त्यातून समाजहिताला बाधक अशा अनेक गोष्टीही होत असतात.

'कन्टेजन'या कादंबरीत अशाच स्वार्थी प्रवृत्तीचा पुन्हा एकदा आविष्कार झालेला दिसतो.

'कन्टेजन'च्या कथावस्तूच्या केंद्रस्थानी एक अभिनव कल्पनाव्यूह आहे. अमेरिकेत आरोग्यविमा उतरवणाऱ्या काही कंपन्या आहेत. अमेरीकेअर, नॅशनल हेल्थ इ. या कंपन्यांमध्येही स्पर्धा असते आणि जास्तीत जास्त ग्राहक आपल्याकडे आकृष्ट व्हावे यासाठी त्यांची धडपड चालू असते. त्यासाठी जाहिरात मोहिमांचेही सहाय्य घेण्यात येते. या संस्थांनी चालवलेली हॉस्पिटल्सही असतात. असाध्य व्याधींनी पीडित अशा व्यक्तीही या संस्थांकडे विमा उतरवतात व ठराविक हप्ता भरतात. महागडी औषधे आणि रुग्णालयातील वास्तव्य याचा खर्च मग या संस्था करतात. अशा दीर्घकाळ महागड्या उपचारांची गरज असणाऱ्या रुग्णांवर होणारा खर्च हा हप्त्याच्या रकमेच्या तुलनेने खूप मोठा असतो, आणि त्यामुळे त्या विमा कंपनीला मोठाच भूर्दंड सहन करावा लागतो. अशा व्यक्तींना जर काही जीवघेण्या विषाणूंद्वारे तडकाफडकी मरण देता आले तर त्यामुळे विमा कंपनीचा मोठाच खर्च वाचू शकतो.

आता अशा रुग्णांना झटपट मरण यावे, ते मरण स्वाभाविक वाटावे, त्यातून कायदेशीर पेच उभे राहू नयेत, म्हणून कोणता मार्ग सोयीचा ठरेल?

अमेरीकेअर ही कंपनी त्यासाठी प्लेग, इन्फ्लुएंझा, टुलरेमिया वगैरे संसर्गजन्य रोगांचे विषाणू त्या रुग्णाच्या शरीरात प्रवेश करतील अशी योजना करते; आणि त्यामुळे विषाणूंची वाढ शरीरात द्रुत गतीने होत असल्याने, तो रुग्ण काही तासातच दम तोडतो. या संसर्गजन्य विषाणूंची बाधा होऊन आलेल्या मृत्यूबाबत कोणी संशय घेण्यालाही वाव नसतो; आणि हे विषाणू जुन्या काळातील असल्याने त्यांचा पुन:प्रादुर्भाव होणे हा वैद्यकशास्त्राच्या दृष्टीनेही एक कुतूहलाचा व अनाकलनीय



### पुस्तकाची खास वैशिष्ट्ये...

क्रोमोझोम-६ या गाजलेल्या कादंबरीचा लेखक डॉ.रॉबिन कुक याची वैद्यकीय क्षेत्रावर आधारलेली आणखी एक थरारकथा.
पृथ्वीवरून नामशेष झालेल्या संसर्गजन्य साथींच्या दुर्मिळ विषाणूंचा वापर करून असाध्य व्याधीग्रस्तांना कायमचे बरे करण्यासाठी चालणारे डावपेच.
अमेरिकेतील आरोग्य विमा पुरवणाऱ्या संस्थांतील स्पर्धा आणि जादा धंदा मिळवण्यासाठी व नफ्यासाठी वापरले जाणारे मार्ग.
एका डॉक्टरने यासर्व रॅकेटचा पत्ता लावण्यासाठी केलेली हेरगिरी आणि त्यामुळे त्याच्यावर झालेले प्राणघातक हल्ले.

प्रकार म्हणून दुर्लक्षित राहू शकतो. त्यामुळे रुग्णाचा मृत्यू ही एक न उलगडलेली केस या सदराखाली ढकलून कायद्याला व पोलिसयंत्रणेच्या तपासाला बगल देता येते.

अर्थात साथीचे रोग आटोक्यात आणण्यासाठी आता जगभर संशोधन चालू आहे आणि बहुतेक संसर्गजन्य रोगांच्या विषाणूंचा पत्ता लागलेला आहे. प्रत्येक रोगावरील लसही शोधून काढण्यात आली आहे. अशा विषाणूंचे नमुने अमेरिकेतील काही प्रयोगशाळांमध्ये अभ्यासासाठी जपून ठेवले जातात आणि संशोधकांना व रुग्णालयांना ते हवे तेव्हा उपलब्ध करून दिले जातात. अशा संशयास्पद मृत्यू पावणाऱ्या व्यक्तींची शवविच्छेदने करून मृत्यूचे नेमके कारण शोधण्यात येते. मरणोत्तर तपासणीच्या रिपार्टलाही त्यामूळे खूप महत्त्व येते.

डॉ.रॉबर्ट कुक यांनी या मूळ कल्पनेला एका उत्कंठावर्धक कथानकाची व्यापक चौकट प्रदान करून कन्टेजन ही थरारकथा रंगवली आहे. २० मार्च १९९६ ते २९ मार्च १९९६ अशा दहा दिवसांत न्यूयॉर्कमध्ये घडणाऱ्या घटना तिच्यात येतात.

न्यूयॉर्कच्या मध्यवर्ती शवागारातील एक वैद्यकीय तपासनीस डॉ.जॅक स्टेपलटन याला मॅनहटन जनरल हॉस्पिटलमधून आलेल्या एका शवाची तपासणी करताना प्लेगचे विषाणू आढळतात. तो त्यामुळे एकदम हादरतो. उद्या प्लेगची साथ न्यूयॉर्कमध्ये पसरली तर काय हाहाकार माजेल! कारण प्लेगचे विषाणू विशिष्ट परिस्थितीतच संक्रमित होऊ शकतात; या रुग्णात ते आढळले याचा अर्थ इतरही रुग्णांना ते सतावणार. तो मॅनहटन हॉस्पिटलमध्ये जाऊन त्याबद्दल चौकशी करतो, न्यूयॉर्कच्या मेयरना आणि संबंधित विभागाला ॲलर्ट करतो... पण त्याच्यावरच सर्वजण उखडतात.

...नंतर दुसऱ्या एका शवाचे विच्छेदन केल्यावर टुलरेमिया या दुर्मिळ संसर्गजन्य रोगाचे विषाणू आढळतात.

तिसऱ्या दिवशी रिकेटशिया रिकेटचे विषाणू आढळतात.

तीन दिवस लागोपाठ तीन दुर्मिळ रोगजंतू आढळल्याने सर्वच संबंधितांना काळली वाटते...

डॉ.जॅक स्टेपलटन यांना या सर्व संसर्गजन्य रोगांचा उगम मॅनहटन हॉस्पिटलमध्ये आहे हे

आढळून येते. ते हॉस्पिटल अमेरीकेअर या आरोग्यविमा कंपनीने चालवलेले असते; आणि मृतांमध्ये अमेरीकेअर विमा उतरवलेले असाध्य व्याधी असणारे रुग्ण आणि त्यांच्यावर उपचार करणाऱ्या नर्सेस व त्या हॉस्पिटलमधील पुरवठा विभागात काम करणारे कर्मचारी असतात... या सर्व बाबींचा डॉ.जॅक आपल्या परीने शोध घेऊन, मॅनहॅटनच्या मुख्य व्यवस्थापकाला म्हणतो,''आपल्या हॉस्पिटलमधून हे साथीचे विषाणू पसरवण्याचा पद्धतशीर प्रयत्न चाललेला आहे. तुमच्या येथील तपासणीत हे विषाणू सापडल्याची नोंद नाही. हे पेशंट हाताळणाऱ्या नर्सेसनाही व इतर रुग्णांनाही त्यापासून धोका आहे.''

हॉस्पिटलमध्ये दाखल झालेल्या रुग्णाला हॉस्पिटलमध्येच रोगाची लागण होणे, ही नोसोकॉमियल संसर्गाची घटना भयंकर असते. कारण येथे वावरणारे घातक रोगजंतू मुळातच अँटिबायोटिक औषधांना सरावलेले असतात. प्लेगचा प्रसार पिसवांद्वारा होतो तर टुलरेमियाचा गोचिड व हरितमाशांमुळे होतो. उंदीर आणि ससे या सस्तन प्राण्यांच्या आधाराने हे विषाणू वाढतात. रिकेटशिया म्हणजे रॉकी माऊंटन स्पॉटेड फिवर हा भयंकर संसर्गजन्य रोग. प्रयोगशाळेतही अपघातानं रोगाची लागण होण्याचा धोका त्यात असतो. हे तिन्ही रोग हवेतून पसरू शकतात; पण त्यांना वाहक म्हणून आथ्रोपोड वाहक लागतात. ते मार्चमध्ये न्यूयॉर्कमध्ये सहसा आढळत नाहीत. तरीही हे रुग्ण या विषाणूंनी मेलेले असतात. या मागे काहीतरी गूढ नक्कीच असणार.

या तिन्ही रोगांनी मेलेल्या पेशंटमध्ये जॅकला काही गोष्टी समान आढळतात. हे तिघे दीर्घकालीन व्याधिग्रस्त होते. 'आधी पैसे भरा' या अमेरीकेअरच्या योजनेतले पेशंट होते. अशा चिवट दुखणे असलेल्या पेशंटसवर खर्च करण्यापेक्षा त्यांचा कायमचा बंदोबस्त करणं फायदेशीर.

अशा स्वरूपाचा तर्क किंवा आरोप ऐकल्यावर मॅनहॅटन हॉस्पिटलचे व्यवस्थापक व डॉक्टर्स जॅकवर भडकणार हे नक्कीच!

त्याच रात्री जॅकवर त्याच्या घरात दोन गुंड हल्ला चढवतात आणि ''या प्रकरणात लक्ष घालू नकोस, नाहीतर जिवंत राहणार नाहीस.'' अशी धमकी देऊन, त्याचा एक दात पडेल असा ठोसा देऊन निघून जातात. हा हल्ला मॅनहॅटन हॉस्पिटलच्या व अमेरीकेअरच्या सांगण्यावरून झाला असणार असा जॅकचा व वाचकांचाही समज होतो.

हार्लेम या निग्रो वस्तीत जॅक राहत असतो, तेथील एक गुंड वॉरेन याच्या फूटबॉल टीममध्येही खेळत असतो. जॅकवरचा हल्ला किंग्ज क्लब या टोळीच्या गुंडांनी केलाय हे वॉरेनला कळते तेव्हा तो भडकतो. आमच्या हद्दीत या टोळीचे गुंड आले हे गैर. तो जॅकला शरीररक्षक देतो... आणि तो सतत त्याच्याबरोबर राहील अशी व्यवस्था करतो.

या कथानकाला आणखी एका उपकथानकाची जोड दिली गेली आहे. अमेरीकेअरच्या प्रतिस्पर्धी नॅशनल हेल्थ या आरोग्य विमा क्षेत्रातील संस्थेसाठी एक जाहिरात मोहिम तयार करण्याचे काम अॅड एजन्सीकडे आलेले आहे, आणि त्यासाठी आकर्षक कल्पना व सूत्र टेरेस व तिचे साथीदार हे शोधत असतात. जॅकशी तिच्या ज्या गप्पा होतात, त्यावरून तिला असे सूत्र सापडते आणि ती जॅकशी घसट वाढवते. त्याच्या हॉस्पिटलमध्ये येते; मॅनहटन हॉस्पिटलमधील संसर्ग प्रकरणही तिला कळते व ती त्यातले तपशील जाणून घेते... त्याला वरचेवर जेवणासाठी बोलावते. एका पोलिस अधिकाऱ्याला सांगून जॅकवरील हल्ल्याची माहिती देते...

अशा प्रकारे न्यूयॉर्कमधील हॉस्पिटल्स, दोन आरोग्यविमा कंपन्यातील स्पर्धा, प्लेगसारख्या साथींचे भयंकर विषाणू, हॉस्पिटल्समधील अंतर्गत राजकारण व संघर्ष, निग्रो वस्तीतील गुंडांच्या टोळ्या, महापौर-महानगर आरोग्यखाते, हॉस्पिटलमधील पुरवठा विभाग, प्रयोगशाळा, दुर्मिळ विषाणू पुरवणाऱ्या प्रयोगशाळा व त्यांची कार्यपद्धती, पोस्टमार्टेम करणाऱ्या संस्थेची कार्यपद्धती, फुटबॉलचे हौशी खेळाडू, आपल्या संस्थेची जाहिरात करून अधिक ग्राहक मिळवण्यासाठी चाललेली झटपट अशा अनेक कथासूत्रांना डॉ.रॉबिन कुकने नऊ-दहा दिवसात घडणाऱ्या या कथाचौकटीत सामावून घेतले आहे. वैद्यकीय नीतिमत्ता, आचारसंहिता, डॉक्टरांची कर्तव्ये, प्रत्येक विभागाची स्वायत्तता व अस्मिता, संस्थेचे हित विरुद्ध समाजाचे हित असे नैतिक प्रश्नही त्यात गुंतलेले आहेत.

जॅक हा डॉक्टर आहे. तो मूळचा नेत्ररोग तज्ज्ञ. चांगली प्रॅक्टिस, दोन मुले, पत्नी. सुखी संसार. पण अमेरिकेअरच्या वाढत्या वर्चस्वामुळे त्याची प्रॅक्टिस संपुष्टात येते आणि त्याला पत्नीमुलांपासून दूर येऊन न्यूयॉर्कला शवविच्छेदनाचे प्रशिक्षण घेऊन नवे काम करणे भाग पडते.

त्याची पत्नी व मुले विमान अपघातात मरतात. त्यामुळे तो जीवनाला वैतागलेला, कडवट, अलिप्त बनलेला. जणू स्वत:वरच सूड उगवायचा म्हणून घाणेरड्या निग्रो वस्तीत तो राहतो. मोटारऐवजी सायकलीने सर्वत्र फिरतो. स्वत:ला कामात झोकून देऊन दु:ख विसरू पाहतो.

अमेरीकेअर या संस्थेवर त्याचा राग... त्यामुळे हा वैयक्तिक राग संस्थेवर काढतो असा आरोपही त्याच्यावर त्याचेच बॉस करतात. त्याची मते त्यामुळे प्रारंभी ते गंभीरपणे घेत नाहीत. त्यालाच धमकावतात. नोकरीतून काढून टाकू अशी वॉर्निंग देतात.

...एका हॉटेलमध्ये त्याला ठार मारण्याचा पुन्हा प्रयत्न होतो, आणि त्यात त्याच्या पुढे उभा राहिलेला त्याचा शरीररक्षक ठार होतो. तो मात्र वाचतो.

...या साथींच्या रोगाचे विषाणू पसरवण्यात कोणाचा हात असतो हे अर्थातच पुढे जॅकला कळते... आणि त्याला धक्का बसतो.

रहस्यकथेचे तंत्र डॉ. रॉबिन कुक वापरतो. त्यामुळे हा शेवटचा गौप्यस्फोट तसा अनपेक्षित असल्याने वाचकही चक्रावतात.


पाश्चात्य लेखक एखादा विषय घेतला की त्याचा अत्यंत बारकाईने अभ्यास करतात. वैद्यकीय व्यवसायावरची ही कादंबरी, तिच्यातील प्लेग, टुलरेमिया, रॉकी माऊंटन स्पॉटेड फिव्हर, १९१९-२०चा इन्फ्लुएंझा, वगैरे साथींचे तपशील, त्यातील विषाणूंची कार्यपद्धती, प्रयोगशाळांमधील चाचण्या आणि हे सर्व सांगताना संबंधित व्यक्तींचे वैशिष्ट्यपूर्ण स्वभावदर्शन घडवण्याची कुशलता त्यामुळे या बेस्टसेलर्सचे आवाहन हे प्रभावशाली ठरते.

अशा साथींची शक्यता आपल्याकडे ही आहे हे लक्षात आल्यावर आपलाही थरकाप होतो...

**किंमत : २४०रु. सभासदांना :१८०रु. पोस्टेज :२५रु.**


**अनुवादित साहित्य म्हणजे विविध अनुभवांचा प्रत्यय देणारे साहित्य. व टी बुक क्लब म्हणजे उत्कृष्ट साहित्याच्या दर्जेदार अनुवादाची हमी.**

टी बुक क्लबचे सभासद व्हा आणि अनुवादित पुस्तके निम्म्या किंमतीत मिळवा!
अधिक माहितीसाठी लिहा
मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६, सदाशिव पेठ, पुणे-३०




# वडवाई

**अंजनी नरवणे**

**सोन्याच्या वटवृक्षाच्या सावलीत वाढत, समृद्ध श्रीमंत होत जाणाऱ्या कुटुंबाची कथा**

वडवाई ही अंजनी नरवणे यांची रचना कृती कादंबरी-आत्मकथन यांच्या सीमारेषांवर रेंगाळते, आणि पन्नास वर्षांतील घटनांना सामावून घेते.

वडवाई म्हणजे वटवृक्षाची पारंबी.

या एकेका पारंबीतूनही नवा वटवृक्ष अवतरू शकतो.

आणि वडादरा या गावातल्या वटवृक्षाला तर दैवी वरच लाभलेला.

''तू सोन्याचा होशील'' असा विश्वामित्राचा वर म्हणजे या विशाल वटवृक्षाचा जो आश्रय घेईल त्याला सुखसंपत्तीरूपी सोन्याचा ठेवाच गवसावा असा वर.

या वडोदरामध्ये पुण्यातील गोखले कुटुंबातील एक डॉक्टर कन्या 'तेजस्विनी रणजित पटेल' बनून जाते आणि बडोद्यातील गुजराती जीवनशैलीशी आपली नाळ जुळवते.

गुजराती पटेल कुटुंबाशी सणउत्सवांशी, रीतिरिवाजांशी, खानपान विशेषांशी, ती जुळवून घेते. एक डॉक्टर म्हणून आपली जबाबदारी पार पाडतानाच सून म्हणून, पत्नी म्हणून, आई म्हणून आपल्या कर्तव्याचीही यथायोग्य पूर्तता करते आणि घराण्याचे वैभव वाढवते. १९५० पासूनच्या पुढच्या पन्नास वर्षातल्या या घटनाक्रमात स्वत:चे वैद्यकीय करीयर, एकत्र कुटुंबातील विविध टप्पे आणि बडोदा शहराचे बदलते स्वरूप या तिन्ही आशयसूत्रांकडे लक्ष पुरवत 'वडवाई'ची कहाणीपुढे जात राहते.

वडवाईची नायिका आहे तेजस्विनी गोखले. वडील निवृत्त कर्नल. पुण्यात स्थायिक. तेजस्विनी मुंबईच्या कॉलेजातून डॉक्टर व एम.डी. (गायनॅक) झालेली. एका दक्षिणी सह विद्यार्थ्यांच्या प्रेमात पडलेली, पण त्याच्या दगाबाजीने संतप्त झालेली. तिला गुजराती रणजित पटेल या सहकारी एम.डी. डॉक्टरबद्दल आकर्षण वाटते; आणि त्याची पहिली पत्नी लग्नानंतर दोन वर्षांनी बाळंतपणात मृत्यू पावते व मागे नवजात मुलगी मात्र ठेवून जाते, हे कळूनही ती त्याच्याशी लग्न करायचे ठरवते. रणजित पटेलच्या कुटुंबियांना रीतीप्रमाणे भेटून, ठरवून लग्न होते आणि लग्नानंतर तेजस्विनी नवऱ्याबरोबर हॉस्पिटल उभे करते. बडोद्यात आपल्या कर्तृत्वाने नाव काढते. घरातल्या सर्वांचा विश्वास संपादन करून, घराचे घरपण समृद्ध करते. तिचा मुलगा जयदीप हाही अमेरिकेत शिक्षणासाठी जातो. तेथेच डॉलीशी लग्न करतो. मुलगा



## पुस्तकाची खास वैशिष्टये...

- बडोदा शहराची गेल्या ५० वर्षातील वाटचाल आणि पटेल कुटुंबांची वाटचाल यांचा समांतर आलेख.
- महाराष्ट्रीय ब्राह्मण कन्येला गुजराती जीवनशैलीशी जमवून घेताना जाणवलेले ताणतणाव
- विश्वामित्रांचा बडोदा शहराला मिळालेला वर आणि त्याची तेथील नागरजनांना येणारी प्रचीती.

झाल्यावर त्याचे नाव देवदत्त असे ठेवतो. सर्वांच्या तोंडी मात्र डेव्ह हेच त्याचे नाव रुळते.

तेजस्विनी एका बालसहाय अनाथआश्रमाची उभारणी करण्याचे ठरवते इ.स.२०००मध्ये तेजस्विनीचे अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण होते तेव्हा अंतर्मुख होऊन आपल्या आजवरच्या वाटचालीचे सिंहावलोकन पतिपत्नी करतात.

तेजस्विनी म्हणते, ''वडोदरामधल्या या वडाच्या सावलीत माझं जीवन सुखी होईल? माझं जीवनही या वडाच्या झाडासारखं विस्तारत, फोफावत जाईल? या वटवृक्षाची एक पारंबी होऊन इथल्या मातीत रुजता येईल मला? मूळ झाडाचा एक चिमुकला आधार होऊ शकेन मी?... आणि रणजित, माझं जीवन सुखी तर झालंच, पण मला माझ्या प्रयत्नांनी जेवढं म्हणून करता येईल तेवढं मी केलं, याचा संतोष आहे जिवाला. आता फक्त एकच इच्छा उरलीय. आपली मुलं सहाय्याचं कामही पुढं नेत आहेत, पण हे विद्यार्थी सहाय्याचं कामही पुढं चालू राहायला हवे.''

मंदार, जान्हवी, तोरल वगैरे विशीतली तरुण नातवंडे आपल्या 'बडी मा'ला सांगतात, ''आम्ही आता लहान नाही, मी बावीस वर्षांचा. ही जान्हवी पण तेवढीच... आम्ही तुला पंचाहत्तरीचं प्रेझेंट म्हणून एक वचन देतोय. ही नवी संस्था आणि तुझ्या सगळ्या संस्था आम्ही छान चालवू. आपापली कामंही बडोद्यातच राहून करत राहू.''

तेजस्विनी म्हणते,''आजच्या वाढदिवसाला एवढी मोठी प्रेझेंटस मिळतील असं वाटलं नव्हतं. आता कसलीच काळजी उरली नाही. सार्थक झालं जन्माचं!''

-आणि त्याच रात्री गाढ निद्रेतून तेजस्विनी चिरनिद्रेत कधी सरकते हे तिचे तिलाही कळत नाही.

तेजस्विनीच्या नजरेतून हे सारे अंजनी नरवणे यांनी टिपले आहे. स्वत: त्याही ४५वर्षे बडोद्यात राहिल्या. त्या पंचेचाळीस वर्षात बडोद्यात झालेल्या स्थित्यंतरांना सामोऱ्या गेल्या. त्या संस्कृतीशी एकरूप झाल्या. तेथील मित्रमंडळींच्या जीवनाशी समरस झाल्या. तेजस्विनीचे स्वत:चेही अस्तित्व आहे. आंतरप्रांतीय विवाहाचे त्याला वेगळेच परिमाण आहे. त्यामुळे

कादंबरीलाही एक वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे.

'वडवाई'मधील रणजित-तेजस्विनी या दांपत्यांच्या कहाणीला समांतर अशी बडोदा शहराचीही कहाणी या कादंबरीत रंग भरत जाते. बडोद्याची माहिती देण्याचाही या पुस्तकाचा उद्देश दिसतो, असा ग्रह व्हावा इतके तपशील येत जातात.

**बडोदा शहर**

बडोदा स्टेशन सुंदर व स्वच्छ. पायऱ्यांसमोर वर्तुळाकार बाग. संभाजीमहाराजांचा पुतळा. घोडागाड्या (११) बडोद्यातील पन्नास वर्षांपूर्वीचा गणेशोत्सव. (१०-१२) मुख्य गणपती महाराजांच्या पॅलेसमधल्या एका इमारतीत. सुंदर आरास. मराठी घरामध्ये गणपती बसे, गुजराती घरात नाही. सूरसागर तलावात विसर्जन. (१८-१९)

बडोदा संस्थानचा इतिहास. विलीनीकरणानंतर संस्थानची राजधानी म्हणून असणारे महत्त्व जाऊन गुजरातेतील एक जिल्ह्याचे गाव एवढेच अस्तित्त्व कागदोपत्री राहिले. १९४९ साली प्रतापसिंहराज यांच्या मनात काही वेगळे विचार असल्याचा संदेह आल्यावर त्यांना पदच्युत करून फत्तेसिंहराव यांना गादीवर बसवण्यात आले. प्रतापसिंह व राणी सीतादेवी यांचे पुढे परदेशातच वास्तव्य राहिले. अनेक मराठा सरदार घराण्यांचाही दबदबा विलीनीकरणानंतर कमी झाला. उपजीविकेसाठी त्यांना वेगवेगळे उद्योग करणे भाग पडले. बडा घर पोकळ वासा अशी त्यांची स्थिती झाली. मात्र शहराच्या कारभाराची महाराजांनी घालून दिलेली पद्धत पुढेही टिकून राहिली. पहाटेच गावाची सफाई होई. बागा, कारंजी, पुतळे, तलाव व्यवस्थित ठेवले जात. खाजगी बस सर्व्हिस होती. सायकलरिक्षा, चौकोनी टांगे, टॅक्सी, वीज-पाणी, शालेय शिक्षण मोफत, फक्त दोन टक्के इन्कमटॅक्स (१७)

बडोद्यातील महत्त्वाची स्थळे - पॅलेस, पोलो जिमखाना, कलाभुवन इंजिनिअरिंग कॉलेज, सयाजी विहार क्लब, खंडेराव मार्केट, महाराणी शांतादेवी टॉकीज. पॅलेस रोडवरील लाल कोर्ट, उत्तराभिमुख न्यायमंदिर आणि त्यावरचे घड्याळ. कारंजे. पूर्वेला भुईकोट किल्ल्यासारखी भिंत. लहेरीपुरा दरवाजा. गावच्या चार दिशांना दरवाजे. वुमेन्स ट्रेनिंग कॉलेज, म्युझिक कॉलेज (२०-२१)

**गुजराती जीवनशैली**

गुजराती कुटुंबाची जीवनशैली. अर्धे पाणी व अर्धे दूध असा भरपूर गोड दाट उकळलेला चहा. पुदिना, गवती चहा, सुंठ, वेलदोडे, दालचिनी वगैरे घालून केलेला चहा. (३२)

बडोद्यातील त्यावेळच्या मेजवान्या. मोकळेच पदार्थ. बटाट्याच्या भाजीतही काजू, बेदाणे यांची खैरात. श्रीखंड, कढी, बासुंदी, दूधपाक, मसालेदार आमटी. भरली परवरे ही लोकप्रिय भाजी. पाहुणे कधीही येत; आणि मग त्यांचे भोजन. दिवाळीत महिमा, सुवाळी, घुगरा, मगज शेव, फाफडा, गाठिया, चिवडा, मिठाया यांची घरोघर रेलचेल. वैविध्यपूर्ण असे. खमण, पात्रा, भजी, बाकरवडी, पेढा, दुधी हलवा, माहिम हलवा, बर्फी. गुजरातमधील रोजचे जेवण पोळी, भाकरी, उसळ, पालेभाजी, दूध, पापड, छुंदा, लोणची, खाकरी, धिरडी, ढेबसं इ.

**सण-उत्सव**

दिवाळीचे लक्ष्मीपूजन. वही पूजन. साल मुबारक म्हणून नातलगांकडे जाणे येणे, नवे कपडे. (४२)



त्यावेळी रेस्टॉरंटची संख्या मोजकीच. थिएटर्सही मोजकीच. कपडे वर्षातून एकदोनदा सगळ्या घरासाठी घरी शिंपी येऊन शिवून देई.(४९)

गुजराती उच्चार, ओफिस, कोलेज, फाधर, मधर, डेडी. आईला बा आणि वडलांना बापूजी हे शब्द प्रचलित. (५२)

थंडीच्या दिवसात बडोद्यात उंध्यु आणि पोंकची धमाल असे. पोंक म्हणजे हुरडा. शेतात जाऊन हिरवी चटणी, लाल चटणी, शेव, जिलब्या, ताक याबरोबर गरम गरम हुरडा खायचा. शेतात माटलीनुं उंध्यु म्हणजे अनेक भाज्या एकावर एक थर देऊन, मडक्यात रचायच्या आणि मोठा खड्डा करून, बंद केलेले मडके त्यात उलटे ठेवून भाजून शिजून काढायचे. कच्चे तेल, हिरवी चटणी याबरोबर उंध्यूचा आस्वाद घ्यायचा. बरोबर जिलबी, ताक, पुऱ्या. (५४)

संक्रांतीच्या दिवशी मांजा व पतंगांचा गदारोळ. तेलपापडीचे डबे फस्त करायचे. शिळी संक्रांत झाल्यावर मांज्याला खडी बांधून मुले आई जा पाई जा लंगीस लडाई जा म्हणत दोऱ्यांची कटाकटाची शर्यत लावायचे. क्रिकेटचेही सामने गल्लीबोळात रंगायचे. (५४)

होळी, धुलेटी गुजरातेतील आणखी एक मोठा सण. लाह्या खजूर एवढंच खाऊन उपास करायचा. रात्री होळी पेटवून तिची पूजा करायची. नारळ होळीत टाकायचा. दुसरा दिवस धुलेटी (धूळवड). रंग-गुलालाची उधळण. भांग पिणं, माफक मद्य घेणं हे त्यावेळी रूढ होते. होळीत तरी! दारूबंदी झाल्यावर वातावरण बदलते. (६४)

पंचवीस मैलांवरील पावागढ डोंगरावर अंबामातेचे मंदिर. डाकोरला ठाकुरजीचे मंदिर. आर्टस कॉलेजवरचा दीडशे फूट उंच घुमट. बारा मैलांवरील आजवा येथील तलाव. पिकनिक स्पॉट. धरणाची ५५ फूट उंच भिंत. या धरणामुळे बडोद्याला १८८५ सालापासून नळाने पाणी मिळू लागले.

**गुजराती विवाहविधी**

गुजराती विवाहविधी ग्रहमुख (ग्रहशांती), मांडवमुहूर्त, पिठी (हळद), हस्त मिलाप, लग्नाचे पापड, शकुनादाखल चवळीची वडी करणे, पापड विकत आणण्याची पद्धत त्यावेळी नव्हती. घरीच करायचे. त्यासाठी आसपासच्या बायकांची मदत घ्यायची. लग्नाच्या आदल्या दिवशी वरद. (पाण्याचा घडा घेऊन पाणवठ्यापर्यंत मिरवणुकीने जाऊन तो भरून आणणे) (८५-८६)

**इतिहास**

गुजरातचा इतिहास-मौर्य काळापासून सुरू होतो. महीनगर बंदर, भडोच. सोजिया, नडियाद ही व्यापारी ठाणी. अल्लाउद्दिन खिलजीने केलेली लूट, पुढे राष्ट्रकूट, वल्लभीपूर, चालुक्य, परमार इत्यादी घराण्यांनी येथे राज्य केले. पाटीदार वा पटेल हे पंजाबातून आले. माळव्याचा राजा भोग याची किर्ती सर्वदूर पसरलेली. आजही गुजरातेतील शेतकरी ज्या बैलगाड्या वापरतात त्या पंजाबातील फिरोझपूरच्या बैलगाड्यांसारख्या आढळतात. (९०-९१)

पंजाबातील लेक व करड या गावांवरून लेऊआ पटेल आणि कडवा पटेल अशी नावे धारण केलेली घराणी आजही येथे आहेत. (९१) वसो, भदारण, धर्मज, करमसद, नडियाद व सोजिया या सहा गावातले शेतकरी पटेल हे उच्च समजले जाऊ लागले. शेतीच्या

उत्पादनाची वसुली करण्याचे काम करणाऱ्या इंजारादारांना अमीन हा हुद्दा मिळाला. ते अमीन पटेल झाले. देसाईगिरी करणारे देसाई म्हणून ओळखले जाऊ लागले. (९३)

नवरात्रीत रस्त्यारस्त्यावर गरबाचे फड रंगत. अंबामातेचा फोटो मध्ये ठेवून चणियाचोळी ओढणी अशा पोशाखात दांडिया घेऊन रिंगणात नाचायचे. (९५)

बडोदा शहराच्या नावाची पूर्वपीठिका. वडाशेजारी वसलेले गाव. वडोदरा. त्याची पुराणातही कथा सापडते. वडाच्या खाली एकदा विश्वामित्र विश्रांतीसाठी थांबले. झोपून उठल्यावर त्यांचा सगळा शीण गेला. ताजेतवाने झाले. मग वडाच्या वृक्षाला स्पर्श करून म्हणाले,''तुझ्या सावलीत खूप छान वाटले. तू सर्वांना उपयोगी पडत असणार. मी तुला वर देतो तू की सोन्याचा होशील.''

तेव्हा वटवृक्षाने म्हटले,''महाराज, कृपा करून असा वर मला देऊ नका. वाटसरू माझे तुकडे करून मला नष्ट करतील.''

''ती काळजी करू नकोस. तुझे सुवर्णरूप कोणाला जाणवणार नाही. जे येथे वस्तीला येतील, ते समृद्ध संपन्न होतील. त्यासाठी वटपद्रक नावाचे गाव येथे वसेल.''

वडपद्रकचे वडोदरू, वडोदरा हात बरोडा झाले. आता पुन्हा वडोदरा. (१०२)

विश्वामित्री नदीला येणारे पूर. पावसाळा. (१०५)

कामाठीबागेच्या बँडस्टँडवर संध्याकाळी होणारी गर्दी. तेथील प्राणिसंग्रहालय. (१०७)

१९५७ साली स्वयंपाकघरात क्रांती झाली. गॅसच्या शेगड्या उपलब्ध झाल्या. प्रेशरकुकरचा वापरही सुरू झाला.(१११)

स्कूटर लॅम्ब्रेटा रस्त्यावर दिसू लागल्या. भाषावार प्रांतरचनेच्या अहवालानुसार द्वैभाषिक अस्तित्वात आले. संयुक्त महाराष्ट्र आंदोलन सुरू झाले. द्विभाषक मोडले. १ मे १९६०रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व महागुजरात या दोन राज्यांची स्थापना झाली. जीवराज मेहता गुजरातचे मुख्यमंत्री झाले. (११३)

**बडोद्याचा विकास**

पृथक गुजरातची निर्मिती झाल्यावर बडोदा हे औद्योगिक कारखान्याचे केंद्र म्हणून भरभराटीला आले. गुजरात रिफायनरी, पेट्रोकेमिकल्स, गुजरात स्टेट फर्टिलायझर्स, हेवी वॉटर प्लँट वगैरे प्रकल्प उभे राहिले. (१२०)

श्वेतक्रांतीमुळे आणंदचे नाव भारतभर पोचले. (१२३)

गुजरातेतील वाणिया हे व्यापारी तर पटेल हे शेतकरी. जैन व वैष्णव या दोन्ही पंथांचे वाणिया आढळतात. वल्लभाचार्यांच्या वैष्णव पंथ व महावीरांचा जैन धर्म. हरिभक्ती व नगरशेट ही दोन वैष्णव वाणिया घराणी प्रसिद्ध. दिलवाडा व राणकपूरची मंदिरे या श्रेष्ठींनी बांधली. (१३५)

गुजरातची प्रसिद्ध पटोला साडी. तिची निर्मिती प्रक्रिया. (१३६)

बडोदा शहरात हात चाललेले बदल (१४१-४२) दुधाच्या बंद बाटल्या मिळू लागल्या. रेस्टॉरंटची संख्या वाढली. हिंदु मुस्लीम दंगे वरचेवर होऊ लागले. हातभट्टीने गुंड टोळ्यांचे फावले. मुसलमानांची भाषा. बोहरा जमातीचे योगदान (१४४)

बडोद्यात प्लॅनेटोरियम सुरू झाले. आर्मीच्या ई एम ई सेंटरमध्ये एक सुंदर मंदिर उभे राहिले. (माधव आचवल यांनी त्याचे डिझाईन तयार केले.) (१४५)



गुजरातमध्ये श्रीकृष्णापासूनच संगीताची परंपरा आहे. बैजू बावरा, नरसी मेहता, दयाराम व पंडित आदित्यराम हे सारे संगीत क्षेत्रातले नामवंत कलाकार. जामनगरचे राजगायक आदित्यराम यांनी ध्रुपद व अन्य शैलीत शेकडो गीतांची रचना केली. साणंदचे ठाकूर जसवंतसिंह यांनी पंडित जसराज प्रभृतींना राजदरबारात स्थान दिले. पं. पलुस्करांचे शिष्य नारायण मोरेश्वर खरे यांना गांधीजींनी साबरमती आश्रमात आणले आणि आश्रम भजनावलीला संगीत द्यायला लावले. ब्रिजभूषण काबरा हे अहमदाबादचे तर हरिप्रसाद चौरसिया सौराष्ट्राचे. (१४८)

अमेरिकेत शिक्षणासाठी जाणाऱ्या गुजराती तरुणांची वाढत चाललेली संख्या. त्यासाठी चाललेली स्पर्धा. (१६१)

बडोद्याचे महापालिकेत झालेले रूपांतर (१९७२-७३) पाइपलाइनने गॅसपुरवठा व्यवस्था (१६३)

गुजरातेतील नवनिर्माण आंदोलन. (१७१)

बडोद्यातील अनाविळ. त्यांची दीड-दोन हजार कुटुंबे. महादेवभाई, मोरारजीभाई, भुलाभाई, मणीभाई हे सर्व अनाविळ. (१८४)


बडोद्याचा कायापालट करणाऱ्या हाउसिंग सोसायट्या.(१८९)

१९८१मध्ये मेडिकलच्या विद्यार्थ्यांचे राखीव जागांवरून आंदोलन. त्यातून उसळलेले दंगे. (२१५)

युगांडाहून आलेल्या गुजराती नागरिकांनी हॉटेल्स, बांधकाम व रेस्टॉरंटस् या क्षेत्रात पाय रोवले. फास्टफूड सेंटर्स काढली. तारांकित हॉटेल्स उभी केली. आइस्क्रीम पार्लर्स, डान्स फ्लोअर्स, इंपोर्टेड वस्तूंची दुकाने, गरब्याचे व्यापारीकरण, कॅटरर्स.(२३७)

अशा या तपशीलांतून बडोदानगरीमध्ये पन्नासवर्षांत झालेल्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, कौटुंबिक परिवर्तनाची सर्वंकष कल्पना येते. पटेल घराण्याची प्रगतिपर वाटचाल आणि बडोदा शहराची समृद्धीची वाटचाल ही जणू समांतर चालू आहे. सामाजिक इतिहासाची सांगड वैयक्तिक कौटुंबिक घटनांशी घालून 'वडवाई'ची रचना करण्यातील चतुराईला दाद द्यायलाच हवी.

**किंमत : २००रु. सभासदांना :१५०रु. पोस्टेज :२५रु.**



**अंजनी नरवणे यांची अजून एक उत्कृष्ट कादंबरी**

***अणसार***

**मूळ लेखिका :** वर्षा अडालजा **अनु.** अंजनी नरवणे

एका श्रीमंत गुजराती कुटुंबातील लाडक्या सुनेला, रुपाला कुष्ठरोगाची लागण होते आणि.... तिचा डॉक्टर असलेला नवराही तिला बहिष्कृत करतो.... अवघं जगणंच पणाला लागलेल्या रूपाची मन हेलावून टाकणारी कहाणी.

**किंमत : १८०रु. सभासदांना : १३५रु. पोस्टेज : २५रु.**




# गटुळं

## रवींद्र बागडे

**गाळात रुतलेल्या माणसाच्या जीवनाचे वास्तव चित्रण**

कुणाच्या पोटी आणि कशा परिस्थितीत जन्म घ्यावा हे कुणाच्या हातात नसते. परंतु काही वेळा नियतीचे फासे इतके विरुद्ध पडतात की जगूच नये असे वाटू लागते. तरीही काहीजण परिस्थितीवर मात करून आपल्या जीवनाला आकार देतात. त्यांची ही धडपड सार्थकी लागते.

'गटुळं' या रवींद्र बागडे यांच्या आत्मकथनात्मक कादंबरीचे स्वरूप नेमके असेच आहे. चर्मकार समाजाच्या जीवनाची पार्श्वभूमी या कथानकाला लाभली आहे.

घरात अठराविश्वे दारिद्र्य, ढोर मेहनत, काबाडकष्ट करून संसार चालवणारी सायमाबाई; तिचा दारुड्या, व्यसनाधीन व बायकामुलांना मारणारा नवरा, पोराबाळांचे लेंढार, हातावरचं पोट त्यामुळे दोन वेळची चूल पेटेल की नाही याची भ्रांत, गलिच्छ फुटपाथवरचे उघडेनागडे जग व जनावराच्या मोलाचे जगणे असे सारे गणित असताना नारायण ऊर्फ 'नाऱ्या' परिस्थितीला टक्कर देत मोठा होतो. त्याने इतक्या विदारक स्थितीतही जपलेली स्वप्ने आणि सामाजिक जाणीव वाचकांना अंतर्मुख करते.

फुटपाथवरील जीवन जगत असताना 'नाऱ्या'ला कळून चुकते की याच चिखलात रुतून बसलो तर काही खरं नाही. म्हणून तो भाजी विकायला लागतो, शाळा शिकतो, पहाटे उठून केळकरांच्या हॉटेलमध्ये नाश्ता करून शाळेत जातो, शाळा झाल्यावर भाजी विकून आयुष्याला आकार देण्याचा प्रयत्न करतो. एक दिवस मॅट्रिक होतो.

आता त्याला नोकरीचे वेध लागतात. कारण पैसा हवा असतो. त्याचवेळी या मोहमयी मुंबापुरीच्या कवेतले सारे अनुभव घेतो. पण त्याला कळून चुकते की आपल्यासारख्या इतरांनाही आपण मदत केली पाहिजे, त्यांचे संघटन करायला हवे ही नवी जाणीव त्याला स्वस्थ बसू देत नाही. म्हणून भोवतालच्या सर्व भाजीवाल्यांना महानगरपालिकेकडून भाजी विकण्याचा परवाना मिळवून देतो. मित्रांच्या संगतीने वेश्यांचे जगही तो पाहतो. त्यांचे जिणे पाहून अस्वस्थ होतो. इतके की शबनम नावाच्या वेश्येबरोबर राहताना तू माझ्याशी लग्न करशील का असेही विचारतो.

नंतर बऱ्याच ठिकाणी नोकऱ्या करतो, तिथेही त्याला वेगवेगळी माणसे भेटतात, त्यांचे प्रश्न भेडसावतात. मध्यमवर्गीय लोकांच्या जगातले बरेवाईट अनुभव घेत राहतो. अशा वेळी त्याचा मामा लग्नासाठी तयार हो म्हणून मागे लगडा लावतो; परंतु आपल्या परिस्थितीची डोळस जाणीव



## पुस्तकाची खास वैशिष्ट्ये...

- नारायण ह्या दलित नायकाचे गरीबीतले बालपण; व्यसनाधीन बाप, कष्टाळू आई, आणि त्या दोघातील अखंड संघर्ष यांची कहाणी.
- भाजी विक्री करून शालेय शिक्षण.
- भाजीविक्रेत्यांसाठी काम करण्याची जिद्द
- एका वेश्येशी मैत्री, लग्नाबद्दल मागणी, पण नकार.
- मामाच्या घरी भावी पत्नीची ओळख. तिचे विलक्षण पूर्वायुष्य.
- पांढरपेशा लोकांपेक्षा वेगळे जग.

असल्यामुळे स्वत:चे घर असल्याशिवाय लग्नाचा विचार झेपणार नाही असे तो सांगतो.

मित्रांच्या मदतीने तो घर घेतो आणि योगायोगाने मामाकडे लोणंदला जातो. मामा राजकारणात असल्याने लहानमोठी समाजसेवेची कामे करी. त्याच्याच दूरवरच्या नात्यातली एक मुलगी लोणंदला नोकरीसाठी आली होती. तिची राहायची सोय मामाने आपल्या घरात केली होती. त्या ठिकाणी उर्मिलेची आणि नारायणाची भेट होते. ओळख होते. मनामनाच्या गाठी जुळू लागतात. उर्मिलेचे पूर्वायुष्य ऐकून नारायणाचे मन हेलावते. आपल्या आयुष्याशी हिचे आयुष्य मिळतेजुळते आहे असे कळून चुकते. तो उर्मिलेकडून तिच्या वडिलांचा मुंबईचा पत्ता घेतो. बापलेकीची भेट घडवतो आणि नारायणाच्या जीवनात उर्मिला येते.


नवीन घर आकाराला येते. नारायणाचा संसार फुलायला लागतो आणि 'गटुळं' घेऊन नारायणाची आई आणि उर्मिलेची सासू नव्या घरात येते. सायमाबाई, तिची मुले, नारायण-उर्मिला आणि नवे घर. सारे फुलू लागते. आकार घेऊ लागते. उर्मिला त्या 'गटुळ्याकडे' पाहत राहते. जणू काही सारे पूर्वायुष्यच त्यात बांधले गेले आहे.

रवींद्र बागडे यांनी जे जीवन दाखविले आहे त्यात एक सच्चेपणा आहे. उगाच प्रसंग ओढूनताणून आणलेले नाहीत. भयाण वास्तवाचे चटके वाचकाला सतत बसतात. सारे चित्रण जिवंत वाटते. या सर्व माणसांचे जग, त्यांचे परस्परसंबंध, त्यांची स्वप्ने याबद्दल वाचताना जयवंत दळवींच्या 'चक्र' कादंबरीची आठवण होते.

पांढरपेशा लोकांच्या आयुष्यापेक्षा खूप वेगळे, धक्का देणारे जग बागडे यांनी मांडले आहे. या निमित्ताने अनेक प्रश्न सहज उभे राहतात. 'नाऱ्या'सारखी असंख्य माणसे अशा परिस्थितीत कशी जगतात? याला जबाबदार कोण? बालमजूर प्रतिबंधक कायदा नेमका कुणासाठी? आधी पोटाची व्यवस्था करून मग चरितार्थासाठी पैसा पाहणारी माणसे कशी राहतात?

'नाऱ्या'सारखी अस्मिता असणाऱ्यांना या पुस्तकाद्वारे निश्चितच पाठबळ मिळेल. फिनिक्स पक्ष्याप्रमाणे राखेतून झेपावणारा कादंबरीचा नायक नाऱ्या, अनेक तरुणांना स्फूर्तिदायक ठरेल.

**किंमत : १२०रु. सभासदांना :९०रु. पोस्टेज :२०रु.**



# श्रद्धांजली

## ज्येष्ठ कवी, गीतकार कैफी आझमी यांचे निधन

पददलितांवरील अत्याचारांची चीड आपल्या लेखणीद्वारा ठिणग्यासारख्या शब्दांनी व्यक्त करणारे, त्याचप्रमाणे प्रेम, शांती यांचा संदेश कवितेतून देणारे, आपल्या उक्तीप्रमाणेच कृतीतूनही समाजसेवा व सर्वधर्मसमभाव साधणारे, समाजवादी विचारसरणीचे ज्येष्ठ उर्दू कवी व गीतकार कैफी आझमी (वय ८७) यांचे १० मे रोजी जसलोक रुग्णालयात फुफ्फुसाच्या विकाराने निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी शौकत, कन्या शबाना आझमी, पुत्र बाबा आझमी असा परिवार आहे.

## दुर्गा भागवत यांचे निधन

आपल्या वैचारिक तसेच ललित साहित्याने गेली ६०-७० वर्षे वाचकांच्या मनावर गारूड केलेल्या आणि विचारस्वातंत्र्याच्या रक्षणार्थ आणीबाणीच्या विरोधात कारावास भोगण्याची हिंमत दाखवलेल्या ज्येष्ठ लेखिका दुर्गा भागवत यांचे मंगळवार दिनांक ७ मे रोजी निधन झाले. निधनसमयी त्यांचे वय ९२ वर्षांचे होते.

ऋतुचक्र, व्यासपर्व, पैस यासारख्या अविस्मरणीय ललित लेखनामधून सामान्य वाचकाकडून तसेच संस्कृतमधील कथासारित्सागर, पालीतील 'विसुद्धीमग्ग' व 'दिव्यावदान', बंगालीतील रवींद्रनाथ टागोरांचे 'लोकसाहित्य' व देशबंधू दासांचे 'सागरसंगीत'आदि मराठी भाषांतरांनी विद्वानांकडूनही आदर संपादित केलेल्या ज्ञानमार्गावरील एका अथक प्रवासिनीचा जीवनप्रवास अखेर संपला. आपल्या अतुलनीय कार्यकर्तृत्वाने महाराष्ट्राच्या जनमानसावर आपला अमिट ठसा उमटवलेले एक असामान्य व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले.

आदिवासी जीवन, लोकपरंपरा हा दुर्गाबाईंच्या आवडीचा विषय होता. त्या संबंधात बाईंनी भरपूर लेखन केलेले आहे. जैन व बौद्ध साहित्यातील कायदा आणि तत्त्वज्ञान, मध्य प्रदेशातील गोंड आदिवासी, भारतीय संन्याशांचे जीवन हे शोधनिबंध मानववंशशास्त्र, समाजशास्त्र या दृष्टिकोनातून त्यांनी लिहिले. लेखनासाठी त्यांना कोणताही विषय वर्ज्य नव्हता. 'व्यासपर्वा'साठी महाभारत, 'पैस'साठी ज्ञानेश्वरीपासून अगदी रायगड जिल्ह्यातील कुणब्यांच्या खापुर्ला हा खाद्यपदार्थ, जुन्या बायकांची सोळा तुकड्यांची कलात्मक चोळी देखील त्यांना लेखनाला विषय पुरवून जात असे.

दुर्गाबाईंच्या निधनाचे कळताच, त्यांच्या अनेक चाहत्यांची रीघ लागली. मुख्यमंत्री विलासराव देशमुख, उपमुख्यमंत्री छगन भुजबळ, सांस्कृतिक कार्यमंत्री प्रा. रामकृष्ण मोरे, उपमहापौर बाबूभाई भवानजी, भाजपचे आ.विनोद तावडे प्रभृतींनी देखील घरी जाऊन दुर्गाबाईंचे अंत्यदर्शन घेतले.

## ग. का. रायकर यांचे निधन

ज्येष्ठ पत्रकार व प्रकाशक ग. का.रायकर यांचे दिनांक २१ मे रोजी निधन झाले. ते ९२ वर्षांचे होते. ''मोडी लिपीच्या संवर्धनासाठी अखेरपर्यंत झटणारा हाडाचा शिक्षक, तसेच पत्रकार व प्रकाशन क्षेत्रातील सन्यस्त व ऋषीतुल्य व्यक्तिमत्त्व हरपले'' अशा शब्दात ग. का. रायकर यांना मान्यवरांनी श्रद्धांजली वाहिली.





# फुले आणि काटे

## खान्देशची संस्कृती जपणारी लोकगीते

खान्देशच्या इतिहासाचे, लोकसंस्कृतीचे, लोकवाङ्मयाचे, लोकजीवनाचे, लोककलांचे, लोकगीतांचे, भौगोलिक परिस्थितीचे सर्वार्थाने संशोधन व्हावे म्हणून खान्देश इतिहास परिषदेची स्थापना झाली. १९९२ सालापासून आठ अधिवेशने जळगाव, शिंदखेडा, भडगाव, दोंडाईचा, धुळे, नगरदेवळा, दहीवेल या खान्देशाच्याच परिसरात झाली.

नगरदेवळा येथे झालेल्या परिषदेत अनेकांनी खान्देशातील रुढी-परंपरा, रीतिरिवाजावर भाष्य केले; पण धुळ्याच्या प्रा. सुनंदा पवार यांनी खान्देशातील मोठे खेडगाव, कुसुंबा, आमउदे, वाडेमारवाड, डांगरी, कापडणे या गावातील वयोवृद्ध स्त्रियांकडून जी मौखिक माहिती मिळविली ती परंपरेतून आलेली माहिती म्हणजे खान्देशी रूढींचे अस्सल दर्शन आहे.

या सर्व उत्सवामुळे खान्देशात वर्षभर उत्साह टिकून असतो. यामध्ये भालदेव बसविणे, कानबाई बसविणे, गुलाबाई मांडणे, गौराई बसविणे, वीर नाचवणे, आसरांना बोहन देणे, जावळ काढणे, पितरांना जेवू घालणे, डेरग भरणे, गंधमुक्ती, वर्षश्राद्ध-वर्षी करणे, चक्र पूजा, साखर चौतचे थाट, रोट करणे, पायघड्या टाकणे, देवतं आणणे, हळद लावणे, फुकणं मिरविणे, बेमाथनी पुजणे, चवरी-भवरी (सप्तपदी) करणे, वडडखीन बसविणे, मुंज्या बसविणे, आखाजीना बार खेडणे, सायखेडा चढविणे, निमसाडा नेसविणे, नवस फेडणे, कुंकू मागणे, धाड्यानं लगीन, तगतराव काढणे, बारा गाड्या ओढणे, कुईक उतारणे, आसरांना बोणं देणे, यातल्या काही पारंपरिक रुढी आहेत, तर काही परंपरेने चालत आलेला कुलाचार आहे.

या सर्व रुढींचे एक वैशिष्ट्य आहे. या निमित्ताने कुळधर्म-कुलाचाराला सारे नातेवाईक एकत्र येतात. या रुढीमुळे मनामनांतला दुरावा आणि अढी तुटून पडतात. अक्षय तृतीयेच्या सणाला खान्देशात खूप महत्त्व आहे. त्याला आखाजीचा सण असेही म्हणतात. मातीचा कोरा घट म्हणजे घागर. ती पाण्याने भरून तिची पूजा करतात. पिवळे फडके बांधून त्यात सुपारी ठेवून त्या माठाची खणता-खणतीन पूजा करतात. अतिशय कृतज्ञतापूर्वक हा मातीचा सन्मान असतो. ही पूजा करतानाच गाणी म्हटली जातात.

'खणखण कुदाई - लखलखमाटी
ती माटी ती माटी - कुमारे घरी
ती माटी ती माटी- तम्हाणे भरी
ती माटी ती माटी- रुमाले झाकी'

लग्नाच्या विधीची सुरुवातच खान्देशात या गाण्यांपासून होते. त्यानंतर घरी देव आणले जातात. त्याला देवतं आणणे असे म्हणतात. मग आधी नवरदेवाला हळद लागते. मग तीच हळद नवरीकडे पाठवितात आणि मग पाच सुवासिनी हातात पोयतं (सुताचा पिवळा धागा) धरतात आणि गाणे एका सुरात एक भगिनी म्हणते, मग इतर भगिनी तीच ओळ पुन्हा म्हणतात.

'गंगा-जमुना दोन्ही खेती तठे काय देव पयानं रोप
तठे काय कापूसनं देठे तठे काय सीताबाई काते
तठे काय परभू उखले ताना ईस्नू किस्नु कांड्या भरे
काय रुक्मिनी पोयतं करे तटनं पोयत कोणले आनं?
तटनं पोयत नवरदेवले आनं नवरदेवना बाप घोडे अुना
बाजा गये रथ उना मोती पये इथ उना...'

अशी प्रतिभासंपन्न शब्दांची उधळण अहिराणी भाषेतून खान्देशच्या उत्सवात ठायी ठायी दिसते. लग्नाची हळद लागल्यावर अशीच गाणी म्हणत तेलण पाडण्याचा बहारदार कार्यक्रम होतो.

अशा लग्नाच्या गाण्यातून स्नेह, वात्सल्य, प्रेमभाव, विरह, आदर, दुःख, शृंगार साऱ्या साऱ्या भावना प्रगट होतात. लग्न लागल्यावर नवरी सासरी येते. सासरच्या अंगणात चौरंग पाट मांडून आंघोळीचा कार्यक्रम होतो. एकमेकांच्या अंगावर गुळण्या उडविणे, तोंडातला पानाचा विडा, खोबरे तोडणे, हातातली सुपारी सोडवणे, हाताच्या काकनची गाठ सोडविणे ही सारी दृश्ये हिंदी चित्रपटातल्या कृत्रिम प्रेमदृश्यापेक्षा कितीतरी पटीने उत्कट वास्तववादी निरागस प्रेमाचे दर्शन घडवितात आणि या आंघोळीचे गाणे म्हणजे प्रतिभाशक्तीचे अस्सल देणे वाटते.

'नवरा नवरी कशा न्हाती तेच पानी ग बने जाती
बनेच पानी ग मोरं पिती तिथून मोरं ग उधळीला
आंब्या चाफ्यावर बसायिला आंब्या चाफ्याची हिरवी काडी
नवरी नेसली हिरवी साडी नवरदेव नवरीला बल्लाईतो
नवरदेव न्हायाला बल्लाईतो मखमलीचा विडा देतो.'

अशा लग्नासारखीच कानबाईची गाणी, आखाजीची गाणी आहेत. आखाजीला गौराई बसविल्यावर तिच्या विसर्जनाला जेव्हा स्त्रिया नदीवर येतात, तेव्हा शंकराचे गाणे म्हणत येतात आणि जातात तेव्हा एकमेकाला शिव्या देतात. मनसोक्त. वाटेल तशा वाटेल त्याला, शिव्या देतात. अर्थात त्या लटक्या असतात. आत प्रेम पण बाहेर शंकराचाच दुसरा तांडव अवतार. गावागावात आलेल्या या सासुरवाशिणी जणू आपल्या मनातला उद्रेकच या शिव्यातून प्रकट करीत असतात. अक्षयतृतीयेच्या काळात बहुतेक ठिकाणी तगतराव काढतात. एका सजविलेल्या बैलगाडीत बाबूंचा रथ तयार करतात. त्यालाच तगतराव म्हणतात. या रथात पुरुषच स्त्रियांचे कपडे घालून उत्तान देहप्रदर्शन करून वाद्ये वाजवीत शृंगारिक गाणी म्हणतात.

संपूर्ण खान्देशाची आर्थिक स्थिती ही शेतीवर अवलंबून आहे आणि दुष्काळ तर खान्देशच्या पाचवीला पूजलेला. अशा वेळी ग्रामस्थ एकत्र येतात, आपल्यातल्याच एकावर उघड्या अंगांनी निंबाची पाने ठेवतात, यालाच धोंड्या म्हणतात. त्याच्याभोवती नाचतनाचत गावातून त्याला फिरवतात. घराघरातल्या महिला पाण्याचा हंडा भरून त्याच्या अंगावर टाकून त्याला ओलेचिंब करतात. त्याला पैसेही देतात आणि मग आकाशातल्या चक्रपाणीची तो सर्वांना करुणा भाकतात...

धोंड्या धोंड्या पाणी दे
साय-माय पिकू दे.

जगदीश देवापूरकर ('महाराष्ट्र'वरून)



# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ जून २००२
◆ वर्ष दुसरे
◆ अंक सातवा

संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन सहाय्य :
सुनीता दांडेकर

अंकाची किंमत १० रु.

वार्षिक वर्गणी ८० रु.
तीन वर्षाची २००रु.
पाच वर्षांची ३००रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

— अनुक्रमणिका —

| | |
|---|---|
| **संपादकीय** - | २ |
| **साहित्यवार्ता** | ५ |
| **पुरस्कार** | २४ |
| **पुस्तक परिचय** | |
| वीरप्पन : अनु. डॉ.प्रमोद जोगळेकर | २७ |
| कन्टेजन : अनु. डॉ.प्रमोद जोगळेकर | ३२ |
| वडवाई : अंजनी नरवणे | ३६ |
| गटुळं : रवींद्र बागडे | ४२ |
| **श्रद्धांजली** | ४६ |
| **फुले आणि काटे** | ४७ |

मांडणी-अक्षरजुळणी :
***मेहता पब्लिशिंग हाऊस***

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१२१६ सदाशिव पेठ,धनश्री अपार्टमेंटस्, पुणे-३०.
फोन : ४४७६९२४ फॅक्स : ०२०-४४७५४६२
Email - mehpubl@vsnl.com

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*